• पंढरपूर • शुक्रवार, २७ डिसेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - २१७




हे संस्कृती संवर्धनाचे राज्य आहे दारुचा बाजार मांडणारे नाही PII



धम्म वाढला तर समाज एक संघ राहील- आ.खरे PIII

## नववर्षाच्या स्वागतासाठी

# विठ्ठल मंदिर खुले ठेवण्याची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** नवीन वर्ष २०२५ सुखाचे समृद्धीचे व आनंदी जावे म्हणून भाविक व पंढरपुरातील नागरिक विठ्ठलाचे दर्शन घेऊन नवीन वर्षाची सुरुवात करतात. मात्र ३१ डिसेंबर रोजी विठ्ठल मंदिर रात्री बंद असल्याने या दिवशी ते रात्रभर सुरू ठेवण्याची मागणी भाविकांतून करण्यात येत आहे .

भाविक नवीन वर्षाची सुरुवात देवाचे दर्शन घेऊन करत असल्याने शिर्डी येथील साई मंदिर व तिरुपती मंदिर तसेच मुंबई येथील रिद्धी सिद्धी गणपती मंदिर व अनेक देवतांची मंदिरे ३१ डिसेंबर रोजी रात्रभर सुरू असतात. यावेळी भाविक मंदिरात जाऊन देवाचे दर्शन घेऊन नवीन वर्षाची सुरुवात करतात. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. पंढरपुरात एकादशीला महत्त्व असल्यामुळे १२ एकादशीला भाविक



विठ्ठलाचे दर्शन घेतात. तसेच नवीन वर्षाची सुरुवात आनंदी वातावरणात व्हावी विठ्ठलाचे दर्शन घेता यावे म्हणून अनेक भाविक व नागरिक ३१ डिसेंबर रोजी पंढरपुरात गर्दी करतात. मात्र विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून रात्री १२ वाजता मंदिर बंद करण्यात येते. यामुळे भाविकांना नवीन वर्षाची सुरुवात विठ्ठलाचे दर्शन घेऊन करता येत नाही. यामुळे भाविक व नागरिकात नाराजी पसरली आहे. आषाढी, कार्तिकी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. यामुळे येणाऱ्या भाविकांना विठ्ठलाचे दर्शन मिळावे म्हणून मंदिर समितीकडून विठ्ठलाचे नित्योपचार बंद करून २४ तास दर्शन खुले ठेवण्यात येते. याच धर्तीवर ३१ डिसेंबर रोजी मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात यावे अशी मागणी भाविकातून होत आहे. तरी भाविकांच्या मागणीचा विचार करून मंदिर समितीने ३१ डिसेंबर रोजी विठ्ठल मंदिर रात्रभर खुले ठेवावे अशी मागणी होत आहे.

पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना विठ्ठलाचे सुलभ दर्शन मिळावे म्हणून शासनाने मंदिर समितीची नियुक्ती केली आहे. यामुळे मंदिर समितीने भाविकांच्या मागणीचा विचार करून विठ्ठलाचे दर्शन ३१ डिसेंबर रोजी रात्रभर खुले ठेवावे अशी मागणी होत आहे. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे पंढरीत येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात म्हणून शासन कोट्यावधी रुपयाचा निधी देत आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे सुशोभीकरण व संवर्धन करण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी दिला असून यातून सध्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. पंढरीत येणाऱ्या भाविकांची संख्या वाढावी यासाठी मंदिर समितीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. शासनाने मंदिर समिती स्थापन केल्यानंतर सुरुवातीचे अध्यक्ष कै. बाळासाहेब भारदे, पागे यांनी मंदिर समितीचे उत्पन्न वाढावे व भाविकांची संख्या वाढावी यासाठी प्रयत्न केले होते. मात्र सध्या मंदिर समितीमध्ये असलेले सहअध्यक्ष व सदस्य असा प्रयत्न करत असल्याचे दिसून येत नाहीत. यामुळे भाविकातून नाराजी पसरली आहे. पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाने वाराणसी व उज्जैनच्या धर्तीवर पंढरपुरात करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी प्रशासनाकडून आराखडा तयार करण्यात येत आहे. भाविकांसाठी शासन प्रयत्नशील असताना मंदिर समितीकडून मात्र सहकार्य मिळत नसल्याने भाविकातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## At a Glance

### जलशक्ती अभियानाचा केंद्रीय पथकाने घेतला आढावा



**सोलापूर :** केंद्रपुरस्कृत 'जलशक्ती अभियान: कॅच द रेन' अंतर्गत विविध विभागाव्दारे करण्यात आलेल्या कामांचा आढावा आज केंद्रीय पथकाने घेतला. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेऊन सादरीकरणही करण्यात आले. या अभियानाचा आढावा केंद्रीय नोडल अधिकारी राकेश कुमार मीना, केंद्रीय अधिकारी एकता धवण या दोन सदस्यांच्या पथकाने जिल्ह्यातील विविध विभागाव्दारे जलशक्ती अभियानाअंतर्गत केलेल्या कामाचा आढावा घेतला. या बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्यकार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम आदी उपस्थित होते.

### विद्यापीठाचा एप्रेटीसशिप व रोजगारासाठी करार

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि भारत सरकारच्या शिक्षा मंत्रालय अंतर्गत असलेल्या बोर्ड ऑफ एप्रेटीसशिप ट्रेनिंग, पश्चिम विभाग, मुंबई यांच्यात सामंजस्य करार झाला. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर आणि बोर्डाचे संचालक पी. एन. जुमले यांच्या पुढाकाराने या करारावर बोर्ड ऑफ एप्रेटीसशिप ट्रेनिंग पश्चिम विभागाचे उपसंचालक एन. एन. वडोदे व विद्यापीठातर्फे कुलसचिव श्रीमती योगिनी घारे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. विद्यापीठातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल विभागाच्या पुढाकाराने हा करार झाला.

### भाजपा सदस्य नोंदणी अभियानाचे उदघाटन



**सोलापूर :** भारतीय जनता पार्टीच्यावतीने सोलापूर शहरात भाजपा सदस्य नोंदणी अभियान राबवण्यात आले. या अभियानाचे उद्घाटन सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे, भाजपा शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, सरचिटणीस पांडुरंग दीड्डी, सरचिटणीस विशाल गायकवाड, सरचिटणीस माजी नगरसेवक प्रा. नारायण बनसोडे व भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

### कासेगाव येथील यल्लमा देवीच्या यात्रेला सुरुवात



**पंढरपूर :** तृतीयपंथी वर्गाची यात्रा म्हणून पंढरपूर तालुक्यातील यल्लमा देवीचे यात्रेकडे पाहिले जाते. या यात्रेचा पहिला दिवस पंढरपुरातून सुरू होतो. पंढरपुरात यल्लमा देवीच्या जग अर्थात देवीच्या मुर्त्यांची मिरवणूक निघते. परंपरेप्रमाणे वैभव जोशी यांच्या घरामध्ये तृतीयपंथी यांच्या माहेरपणाचा मानपान होऊन यल्लमा देवीचे सर्व जग कासेगाव कडे मार्गस्थ होतात. कासेगाव येथील यल्लमा देवीचे यात्रेचा उद्या मुख्य दिवस साजरा होणार आहे.

# जिल्ह्यात २ लाख ४० हजार हेक्टरवर ज्वारीची पेरणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** यंदा जून महिन्यापासून चांगला पाऊस पडला असल्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात ज्वारीची लागवड केली आहे. जिल्ह्यात २ लाख ४० हजार हेक्टरवर ज्वारीची पेरणी झाली आहे. यामुळे जनावरांना मुबलक प्रमाणावर वैरण उपलब्ध होणार असल्यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे नुकसान होते. म्हणून शेतकऱ्यांनी शेतीस जोड व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय सुरू केला आहे. दुधाला बाजारात चांगली मागणी व दर असल्यामुळे अनेक शेतकरी या व्यवसायाकडे वळले आहेत. मात्र गेल्या दोन वर्षापासून पशुखाद्याच्या किंमती वाढल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांना पशुखाद्यासाठी मोठ्या प्रमाणावर रक्कम खर्च करावी लागत आहे. जून महिन्यात चांगला पाऊस पडला असल्यामुळे शेतकऱ्यांनी शेतात पिकांची लागवड केली. यामुळे शेतकऱ्यांना वैरण उपलब्ध झाली. पुन्हा रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी शेतात ज्वारीची लागवड केली आहे. सोलापूर जिल्ह्यात २ लाख ४० हजार हेक्टरवर ज्वारीची लागवड करण्यात आली आहे. सर्वाधिक ज्वारीची लागवड अक्कलकोट तालुक्यात करण्यात आली असून येथे ३२ हजार ५०० हेक्टर वर ज्वारीची लागवड करण्यात आली आहे. या खालोखाल ज्वारीचे कोठार म्हणून समजल्या जाणाऱ्या मंगळवेढा तालुक्यात २३ हजार २२९ हेक्टरवर ज्वारीची लागवड करण्यात आली आहे. करमाळा तालुक्यात २७ हजार ४४५ हेक्टरवर ज्वारीची लागवड झाली आहे तर पंढरपूर तालुक्यात सर्वात कमी ४३५८ हेक्टरवर ज्वारीची लागवड करण्यात आली आहे. जिल्ह्यात २ लाख ४० हजार हेक्टर वर ज्वारीची लागवड करण्यात आली असल्यामुळे जनावरांना मोठ्या प्रमाणावर वैरण उपलब्ध होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.





### काँग्रेसच्या अधिवेशनात शिंदे पिता -पुत्री सहभागी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** २६ डिसेंबर १९२४ रोजी महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या ठीक १०० वर्षानंतर, दि.२६ व २७ डिसेंबर २०२४ रोजी, वीर सौध काँग्रेस रोड बेळगाव येथे अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीची 'नव सत्याग्रह' बैठक आणि आधिवेशन होणार आहे. या बैठकीसाठी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी, यांच्यासह माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह सर्व काँग्रेसचे कार्यकारणी सदस्य सहभागी झाले.

## आमदार होण्याकरिता मंगेवाडीतील युवकाने पूर्ण केले नवस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** सांगोला तालुक्यातील मंगेवाडी येथील युवक दत्तात्रेय उर्फ पप्पू जावीर यांनी डॉक्टर बाबासाहेब देशमुख आमदार व्हावे यासाठी यलमर मंगेवाडी ते पंढरपूर ४८ किलोमीटर अंतरावरती दंडवत घालत पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मीणीचे दर्शन घेतो असे नवस केला होता.

तो नवस पुर्ण करण्यासाठी जावीर यांनी आज आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांची भेट घेऊन तो पण पुर्ण करण्यास जाण्यापूर्वी सत्कार करून पंढरपूरला केलेले पण पूर्ण करण्यासाठी पंढरपुरा कडे रवाना झाले.

त्यांच्या सोबत त्यांच्या पत्नी माया दत्तात्रेय जावीर होत्या. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अमोल खरात, ज्येष्ठ नेते प्राध्यापक बाळकृष्ण कोकरे, ग्रामपंचायत सदस्य रमेश चोरमले, समाधान चोरमले, काशिलिंग चोरमले व शेकापचे अनेक कार्यकर्ते असल्याची माहीती प्रसिध्दी प्रमुख भाई चंद्रकांत सरतापे यांनी दिली.



# जिल्ह्यात विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण होणार!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. यामुळे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी वाचता येते का? याचा लवकरच सर्वेक्षण करण्यात येणार आहे . मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये प्रशासनाने जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण केले. यात विद्यार्थ्यांना मराठी भाषा वाचता येते का? याची पाहणी केली असता आठ पैकी सहा जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील 29 टक्के विद्यार्थ्यांना मराठी भाषा वाचता येत नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे. केंद्र व राज्य शासनाने सक्तीचे शिक्षण



सुरू केले आहे. यामुळे शाळेत न जाणाऱ्या मुलांचा सर्वे करून त्यांना जवळच्या शाळेत दाखल केले जात आहे. शिक्षण घेतले तर

» पान ३ वर

### मोटारसायकलला ट्रॅक्टरने ठोकरले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**माढा :** मुलांना गावातील शाळेत सोडवण्यास मोटार सायकलवरून जात असताना ट्रॅक्टरने जोराची धडक दिल्याने दोघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना लऊळ (ता. माढा) येथे घडली आहे. यात अपघातात मोटारसायकलीवरील भगवान विष्णू देवकर, प्रसाद भगवान देवकर (दोघेही रा. देवकर वस्ती, लऊळ, ता माढा) हे गंभीर जखमी झाले आहेत. याबाबत २५ डिसेंबर रोजी उशिराने विष्णू तुकाराम देवकर (रा. देवकर वस्ती, लऊळ, ता. माढा) यांनी पोलिसांत केली. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत. अपघात होताच ट्रॅक्टर चालक पळून जाण्यात यशस्वी झाला आहे. पोलीस शोध घेत आहेत.

## ढगाळ वातावरणाचा शेतकऱ्यांनी घेतला धसका

# दोन दिवस जिल्ह्यात पावसाची शक्यता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** हिवाळा ऋतू पिकांना पोषक असल्यामुळे शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण आहे. मात्र गेल्या दोन दिवसापासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण आहे. तर 27 28 डिसेंबर रोजी जिल्ह्यात अवकाळी पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. यामुळे याचा धसका शेतकऱ्यांनी घेतला आहे. यंदा जून महिन्यापासून चांगला पाऊस पडला आहे. यामुळे नदी, नाले, ओढे, तलाव, विहिरी, शेततळी पाण्याने भरली आहेत. याचा फायदा खरीप हंगामात झाला आहे. खरीप हंगाम चांगल्या प्रकारे पार पडल्यामुळे शेतकरी खुशीत होते. त्यांनी मुबलक पाणी असल्यामुळे रब्बी हंगामात पिकांची लागवड केली. रब्बी हंगामात हिवाळा ऋतू असल्याने पिकांची वाढ चांगल्या प्रकारे होते. म्हणून शेतकरी आनंदात होते. मात्र गेल्या दोन दिवसापासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण निर्माण झाले असून 27 व 28 डिसेंबर रोजी सोलापूर, सांगली, कोल्हापूर या तीन जिल्ह्यात ढगाळ वातावरण राहून पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी द्राक्षांची लागवड केली आहे. तर हरभरा, गहू शेतात लावण्यात आला आहे. यामुळे पाऊस पडल्यास या पिकांचे नुकसान होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. म्हणून याचा धसका शेतकऱ्यांनी घेतला आहे. प्रत्येक वर्षी पाऊस कमी पडत असल्याने पिकांना पाण्याची कमतरता भासते. यामुळे शेतकरी खरीप व रब्बी हंगामात पाण्याची स्थिती पाहून पिकांची लागवड करतो. मात्र यंदा चांगला पाऊस पडला असल्यामुळे शेतकरी खुशीत असताना निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे.




वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!

सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ रु. मध्ये सहा महिने घरपोच अंक

'दै.पंढरी संचार'

आजच आपला अंक विक्रेत्यांकडे बुक करा अथवा कार्यालयाशी संपर्क साधा.

- संपर्क -

रविकिरण पाटील - ८२०८९४२३४६

दत्तात्रय बनसोडे - ९८९०९७६४७५

बुकिंग मर्यादा २८ डिसेंबरपर्यंत.

**सोलापूर :** वाईल्डलाईफ काँझर्वेशन असोसिएशन सोलापूरच्या सदस्यांनी ४० फुट खोल विहिरीत पडलेल्या नागराजाला जीवदान दिल्याची सुखद घटना घडली आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की राहुल बंडगर यांनी डब्ल्यूसीएएसचे सुरेश क्षीरसागर यांना फोनवर माहिती दिली की हिरज येथे दत्तात्रय बंडगर यांच्या बांधकाम केलेल्या ४० फुट विहिरीत एक साप पडला आहे. त्यानंतर त्याला डब्ल्यूसीएएसच्या सदस्यांनी त्या नागाला कॅरेटच्या सहाय्याने बाहेर काढले. या बचाव कार्यात सुरेश क्षीरसागर, ऋतुराज क्षीरसागर, पप्पु बंडगर यांनी सहभाग नोंदवला.

## विद्यार्थ्यांना व्यवहारातील नफा तोटा समजावा

# पाटील वस्ती (फोंडशिरस) शाळेत भरला बाल आनंद बाजार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** विद्यार्थ्यांना बाजाराचा कोणताही अनुभव मिळालेला नसतो. बाजार आणि मुले यांचा संबंध दूरच, परंतु हाच अनुभव जि. प. प्रा. शाळा,पाटील वस्ती (फोंडशिरस) ता. माळशिरस जि. सोलापूर येथील मुलांना प्रत्यक्ष बाजार भरवून मिळाला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ते बरोबरच दैनंदिन व्यवहार समजावेत, खरेदी विक्रीचा अनुभव यावा, संवाद कौशल्य विकसित व्हावे, व्यवहारातील नफा तोटा समजावाया उद्देशाने शाळेत बाल आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुला-मुलींनी शेतात पिकलेला विविध प्रकारचा भाजीपाला, फळे, किराणा स्टॉल, मक्याची भाजलेली कणसे,घरी भाजलेले चणे, शेंगदाणे, चुरमुरे, ओली भेळ, सुकी भेळ, हॉटेल स्टॉल आदी दुकाने शाळेच्या आवारात थाटली होती. त्यांना बाजारातून होणारी भाजीपाल्याची, फळांची, किराणा मालाची आर्थिक उलाढाल प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली. बाजारातून होणारी पैशांची देवाण घेवाण, भावातील कमी जास्त तफावत, मालाचा दर्जा आदी बाबी विद्यार्थ्यांनी समजून घेण्याबरोबर, भाजीपाला मालक व गिऱ्हाईक यांच्यात पैशांवरून होणारी घासाघीस, बाजारातील गर्दीचाही अनुभव घेतला. बाजार शाळेतच असल्याने कुतूहल आणि उत्साह त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. आपला माल कोण घेते की नाही? पैसे किती मिळतील ? मला जमेल का? असे अनेक प्रश्न त्यांच्यापुढे होते. बाजाराचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय मोटे यांच्या शुभ हस्ते ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

बाजारात खरेदीसाठी गावकऱ्यांनी गर्दी केली होती. मुले, मुली आपल्या मालाचे वर्णन करुन गिऱ्हाईक आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करीत होते." ताजी भाजी, स्वस्त भाजी," "ओली भेळ, सुकी भेळ, मस्त भेळ" असा एकच कोलाहल सगळीकडे दिसत होता. अनेक कौशल्य वापरून त्यांनी आपला सर्व माल विकण्यात यश मिळवले. एक वेगळा अनुभव आल्याने आणि कष्टाची पहिली कमाई मिळवल्याने सर्व मुला मुलींच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.

याप्रसंगी सहावीतील विद्यार्थ्यांनी 'मले बाजाराला जायाचं बाई' या नाटकातून प्लॅस्टिक वापराचे दुष्परिणाम व कापडी पिशवी वापरण्याचे फायदे याविषयी सर्वांचे प्रबोधन केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, अंगणवाडी सेविका, मदतनीस,गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाल आनंद बाजार यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक कैलास गायकवाड, शिक्षक सुनील टेके, बाबुराव जमाले, कुबेर खोत, स्वाती पायमल यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## मंद्रूप येथे अमित शहा यांच्या विरोधात निदर्शने



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथे निषेध करत बाजारपेठेतील चौकामध्ये आज निदर्शने करण्यात आली. मंद्रूप-निंबर्गी रस्त्यावरील बाजारपेठेतील मुख्य चौकात रिपब्लिकन पक्ष, बहुजन हक्क अभियान संघटना व इतर संघटनांनी एकत्र येऊन हे आंदोलन केले. यामध्ये सतीश शिंदे, सचिन फडतरे, लक्ष्मण रणखांबे, अल्ताफ शेख, सागर कोळी आदी कार्यकर्ते हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा घेऊन सहभागी झाले होते. या आंदोलनात निषेधाच्या घोषणा देऊन हे आंदोलन समाप्त करण्यात आले.

## Selected

## उजनीतून २ हजार क्युसेक पाणी सोडणार



**सोलापूर :** जलसंपदा विभागाच्या आदेशानुसार गुरुवार, २६ डिसेंबर रोजी सकाळी उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्यात येणार आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. जलसंपदा विभागाच्या (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांच्या आदेशानुसार भीमा नदीवरील पिण्याचे पाणी आवर्तन क्रमांक १ प्रमाणे गुरुवार, २६ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता उजनी धरणाच्या सांडवा द्वारातून २ हजार क्युसेक इतका विसर्ग सुरू होणार आहे. भीमा नदीकाठच्या ग्रामपंचायतींसाठी पिण्याचे पाणी योजनांसाठी उजनीतून पाणी सोडण्यात येणार आहे.

## दिव्यांग शेतकऱ्याला मारहाण




**माढा :** शेतालगत मळीचे घाण पाणी टाकण्याच्या कारणावरून दिव्यांग शेतकऱ्याला व त्याच्या मुलाला आणि पुतण्याला शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याबाबत किरण नामदेव पाटील (रा. पडसाळी, ता. माढा) यांनी फिर्याद दिली. याप्रकरणी वैभव फरड, संदीप फरड, विलास फरड, शिरीष पाटील (सर्व रा. पडसाळी, ता. माढा) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

## कोटणीस नगरात विठ्ठल रुक्मिणी मूर्तीची प्रतिष्ठापना



**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील कोटणीस नगर येथे श्री गणेश, शिवलिंग व विठ्ठल रुक्मिणी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात करण्यात आली. यावेळी या मतदार संघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार सुभाष देशमुख यांनी उपस्थित राहून मनोभावे पूजा करत देवाचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी श्रीकांत मोरे, सत्येन जाधव, उत्तम शिंदे, महेश देवकर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहाय्यक मोटार वहान निरीक्षक अजित कदम यांची संत दामाजी कारखाना कार्यस्थळावर भेट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** सोलापूर येथील सहाय्यक मोटर निरीक्षक श्री अजित कदम यांनी संत दामाजी सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर बुधवार दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी भेट दिली. यावेळी वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने श्री अजित कदम यांनी वाहन मालक, ड्रायव्हर, कारखान्याचे शेती विभागातील कर्मचारी यांना रस्ते सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. सध्या सर्व देशभर ऊस गळीत हंगाम सुरु असुन ट्रक, ट्रॅक्टर,बैलगाडी,अशा प्रकारच्या ऊसाने भरलेल्या वाहनांची रात्रंदिवस मोठया प्रमाणात वाहतुक सुरु असते. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते. त्यासाठी वाहन चालकानी सुरक्षेचे नियम पाळुन वाहन चालविणे गरजेचे आहे. असुन वाहन चालवताना रस्त्याच्या डाव्या बाजूने चालविणे, प्रत्येक वहान धारकाने वाहनाच्या सर्व बाजुना रेडिअम प्लेट, रिफ्लेक्टर पट्टी बसविणे, वहान चालवत असताना मोठया आवाजात रेकार्ड वाजवु नये, दारु अथवा अमली पदार्थाचे सेवन करुन वहान चालवू नये, रस्त्याच्या मधोमध वहान न थांबविता रस्त्याच्या कडेला वहान थांबवावे, वहान ड्रायव्हर सोबत आणखी एक व्यक्ती सोबत ठेवावा. अशा प्रकारे याप्रसंगी सुचना देण्यात आल्या. तसेच कारखाना अधिकाऱ्यांनाही याबाबत वाहन चालकांवर नियंत्रण ठेवण्याच्या सुचना श्री अजित कदम यांनी दिल्या. कारखाना गळीत हंगाम चालू असताना अनेक वेळा अनेक ठिकाणी अपघात होत असतात. यामुळे सदर बाबत खबरदारी घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सदर प्रसंगी कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक श्री रमेश जायभाय, मुख्य शेती अधिकारी श्री कृष्णात ठवरे, केनयार्ड सुपरवायझर श्री प्रकाश पाटील, ॲग्री ओव्हरसिअर श्री पंडित गायकवाड, जगन्नाथ इंगळे, सुरक्षा अधिकारी श्री लक्ष्मण बेदरे, सहाय्यक श्री प्रमोद महाडीक, चालक संतोष वाळके यांचेसह कारखान्याकडे ऊस वाहतुकीचे काम करणारे वाहन मालक, चालक, शेती विभागातील कर्मचारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## मार्गदर्शन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**मंगळवेढा :** सोलापूर येथील सहाय्यक मोटार निरीक्षक श्री अजित कदम यांनी संत दामाजी सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर बुधवार दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी भेट दिली. यावेळी वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने श्री अजित कदम यांनी वाहन मालक, ड्रायव्हर, कारखान्याचे शेती विभागातील कर्मचारी यांना रस्ते सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले.

# हे संस्कृती संवर्धनाचे राज्य आहे दारुचा बाजार मांडणारे नाही



महाराष्ट्राच्या मातीला एक वेगळा दर्प आहे. महाराष्ट्राच्या मातीला वैदीक संस्कृती, अध्यात्मिक वातावरणाची दिशा साक्षात न्हाऊ घालते. जगद्गुरु शंकराचार्यांच्यापासून चालत आलेली वैदीक परंपरा, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्यापासून ते याक्षणापर्यंत साधु-संत, विज्ञान, वैदीक यांच्याकडून ही अव्याहत कार्यरत होताना दिसते. समुद्रमंथनाचा पौराणिक कालखंड संपूर्ण राष्ट्राबरोबर महाराष्ट्रातल्या संत पुरुषांनी तो सातत्याने समुद्र मंथनात विष राक्षसांच्या वाट्याला गेले आणि अमृत देवादिकांच्या हातात पडले. या पौराणिक कालखंडापासून सात्विक सांस्कृतिक संवर्धन या महाराष्ट्राने केलेले आहे. इंग्रजांचा १५० वर्षाचा कालखंड पारतंत्र्यांत गेल्यानंतर सुद्धा या संस्कृतीने, या संस्काराने आणि वृत्तीने महाराष्ट्राची पाठराखण केलेली आहे. इंग्रजांनी इंग्रजी भाषा जरी आमच्या माथ्यावर मारली तसे उभ्या बाटलीतली मदिरा आमच्या छाताडावर मारुन गेले. हे मदिरेचे भूत महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसले आणि वेगळा इतिहास घडत गेला.

उच्चभ्रू किंवा धनवान लोकांचे व्यसन हे झोपडपट्टीपर्यंत पोहोचले. हे व्यसन करताना विविध प्रकारच्या मद्यांनी शेकडो कुटुंबात प्रवेश केला. महात्मा गांधीसारख्या महात्म्यांनी गुजरातच्या पोरबंदरपासून ते कन्याकुमारीच्या समुद्रापर्यंत आसेतुहिमाचल दारुबंदीचे घनघोर वैचारिक युद्ध प्रत्येक समाजपातळीपर्यंत पोहोचविण्याचे काम केले. त्यांना यशही आले. पारतंत्र पायदळी तुडवून दिल्लीच्या लाल किल्ल्यावर तिरंगा फडकला. पण जाताना या ब्रिटीशांनी मद्यपानाची दिलेली देणगी अजूनही आमच्या छाताडावर थयाथया नाचताना दिसते. हे महाराष्ट्राचे दुर्दैव म्हणावे लागेल.

नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत महायुती सरकारने आपले वर्चस्व सिद्ध केले आणि संयुक्त महाराष्ट्राच्या कुंभाला मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेऊन आपला कार्यभार सुरु केला. मंत्रीमंडळाला विलंब, खातेवाटपाचे घोंगडे आजही तसेच खितपत पडून या सगळ्या बाबी चालू असताना राज्याचे अर्थमंत्री व अबकारी खात्याचे मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या पुढे आर्थिक संकट घोंगावत असताना महसूल उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने अनेक योजनांच्यावर विचारविनिमय केला. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रात सर्वत्र मद्यविक्रीची दुकाने मोठ्या प्रमाणात उघडून त्यातून महसूल गोळा करायचा हा इरादा व्यक्त केला. योग्य न्याय पद्धतीने कर आकारणी करुन राज्याच्या भवितव्यासाठी आणि विकासासाठी आर्थिक तरतूद करणे गरजेचे असते. त्याचाच एक भाग म्हणून संपूर्ण महाराष्ट्र मदिरामय करण्याची भूमिका सरकारकडून व्यक्त करण्यात आली. वास्तविक पाहता आजही आदीवासी पाड्यात किंवा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात थकलेल्या, भागलेल्या शेतमजूरास मदिरापान करुन आपल्या कष्टाचे ओझे हलके करणयाची परंपरा आहे. पण या परंपरेने आता तालुका आणि जिल्हा स्तरावर ील भागातही मोठ्या प्रमाणात प्रवेश केल्याचे दिसून येते. प्रत्येक तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या ठिकाणी बारवृत्ती जसी वाढलेली दिसते तशी हमरस्त्यावरील हॉटेल आणि धाब्यावर दोन पेग मारण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे.

कांहींना अबकारी खात्याच्या अधिकाऱ्यांचे अभयदान आहे. तर कांहींना खाकी वर्दीचा आशीर्वाद आहे. पंढरपूर सारख्या तिर्थक्षेत्रासारख्या उपविभागीय पोलिस अधिकारी असलेले अर्जुन भोसले यांच्यासारखे कर्तव्यदक्ष आणि कर्तव्य तत्पर अधिकारी जेंव्हा रांजणीसारख्या ग्रामीण भागात धाड टाकून लाखो रुपयांचे मद्य जप्त करतात आणि मद्य विक्रीला सुरुंग लावतात असे जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात किती अधिकारी आहेत याचा शोध घेंणे आता गरजेचे आहे. आणि हा शोध महाराष्ट्राच्या हिताचा ठरणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात दारुच्या अड्डयांची लयलुट असतानाच आमचे अर्थमंत्री महसूल वाढीसाठी दारुची दुकाने वाढविण्याचा संकल्प सोडतात हे महाराष्ट्राचा भाग मानावा लगेल. नुकत्याच जाहीर झालेल्या एका अहवालानुसार WHO ( जागतिक आरोग्य संघटना ) यांनी जाहीर केले आहे. माणसाच्या मृत्युला परिणामकारक असे दोन घटक आहेत. ते म्हणजे दारु आणि तंबाखू. या दोन्ही व्यसनांनी मृत्युचा अप्तकाल जवळ येऊ शकतो. असे स्पष्टपणे जाहीर केले आहे. अशा दारुने केवळ उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मद्याचा मांडलेला बाजार हा समाजाच्या हिताचा ठरणार आहे?

आज मद्यपीच्या दृष्टीकोनातून बारकाईने पाहिले तर मद्यसेवनाचा प्रकार जसा वृद्धात वाढत आहे तसा तो तरुणांतही वाढलेला दिसत आहे. इतकेच नव्हे तर आमचा महाविद्यालयीन तरुन हा सुद्धा व्यसनाच्या आहारी गेलेला जातो. ग्रामीण भागात किंवा शहरात काय? दारुच्या व्यवसनाने अनेक कुटुंबे उध्वस्त होताना दिसत आहेत. दिवसभर काबाडकष्ट करायचे आणि आणि अर्धाभर बाटली रिचवायची. आणि कष्टाचं ओझं हलकं करायच. या धुंदीत किंवा कांही मनाविरुद्ध झालं तर त्या काबाडकष्ट करणाऱ्या पत्नीला, मुलाला झोडपायचं. राग अनावर जेंव्हा होतो तेंव्हा बायकोचा मुडदा पाटून टाकायचा. हे आमच्या महाराष्ट्राचं आजचं वास्तव आहे. तुमच्या अनेक योजना राबविण्यासाठी किंबहुना महसुली तुट भरुन काढण्यासाठी अनेक असंख्य पयार्य उपलब्ध आहेत. पण ज्या महसूल उत्पन्न वाढीच्या कारवाईने पुन्हा हजारो संसार उध्वस्त करण्यासाठी मदिरालयाची संख्या वाढविणे हे न्यायाचे आणि न्यायाचे असे आह का?

आज संपूर्ण देशात मद्यविक्रीचे प्रमाण पाहिले तर अंगावर शहारे आल्याशिवाय राहत नाही. वाईनसारखे मद्य वर्षाला ७० लाख लिटर विक्री होते. ७६. ७ लिटर दारु रोज मदीप्या घशात उतरते. याहीपेक्षा भयानक बाब म्हणजे २० कोटी लिटर विदेशी मदिरा रोज विक्री होते. याहीपेक्षा उच्च दर्जाची मदिरा ३५ कोटी लिटर विकली जाते. याशिवाय ग्रामीण भागात हातभट्टीची दारु, कुकडं अशा प्रकारची मद्य गुळापासून किंवा विशिष्ट फळांपासून हजारो लिटर तयार केली जाते. पण कुठे पुढाऱ्यांचा आशिर्वाद, खाकी वर्दीचा छुपा पाठिंबा आणि अबकारी खात्याचे दुर्लक्ष यामुळे या व्यवसायाला भर आल्याचे दिसून येते. कांही तज्ञांच्या मते वाईन हे मद्य द्राक्षपासून तयार केले असले तरी यात १० टक्के असते हे who ने सुद्धा मान्य केले आहे.

आज अनेक प्रकारचे मद्य विक्री शासनाने परवानगी दिलेल्या मद्य विक्री दुकानातून होत असते. परप्रांतातून चोरट्या मार्गाने आलेली लाखो लिटर दारु शिस्तबद्धरितीने ग्राहकांपर्यत पोहोचवली जाते हे मद्य वास्तव आपण कधीच नाकारु शकत नाही. अलिकडे मद्यप्राशन करण्याचे प्रमाण वाढताना दिसते.

हे गृहित सत्य धरुन सुद्धा पुन्हा एकदा महसूलीत तूट भरुन काढण्यासाठी दारुची दुकानं वाढविण्याच्यादृष्टीने प्रयत्न होणार असतील तर ते सामाजिक अधःपतन ठरेल. गरीबांना दोन घास सुखानं जगू द्या. दारुड्यांच्या कुटुंबातील पत्नीला, मुलाला, परिवाराला सुखाचे, समाधानाचे दिवस येऊ द्या आणि संपूर्ण राज्य नशामुक्त राज्य म्हणून घोषणा करण्याची ही वेळ आहे. पण असे घडताना दिसते हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे संस्कृती संवर्धनाचे प्रणेते आहेत. रेशीमबागेशी राष्ट्रीय आणि सामाजिक शिक्षण ही त्यांच्या अंतःकरणाचा ध्यास आहे. ते स्वतः कबुल करतात, "राजकारण माझा व्यवसाय नाही, छद नाही. राजकारणातील हेवेदावे मला मान्य नाहीत. सामाजिक संवर्धन हा माझा नैतिक अधिकारी आहे पण केवळ वरिष्ठांनी दिलेली अज्ञा म्हणून मी भाजपाच्या कार्यात सहभागी झालो आहे." असे उदात्त हेतू असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीत महसूली तूट भरुन काढण्यासाठी दारुच्या अड्याची (दुकाने) वाढविणे चुकीचे ठरणार आहे हे वास्तवही नाकारणे चुकीचे ठरणार नाही. महाराष्ट्राचा साधारण कौल पाहिला तर ७० टक्के नागरिकांना मद्य विक्रीच्या परवान्यात वाढ करण्यासाठी विरोध असताना दिसतो. तर फक्त ३० आणि ३१ टक्के लोक या सरकारच्या विचाराला आपली सहमती दर्शवितात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या चाणाक्य नीतीच्या मुख्यमंत्री महोदयांनी दूरदृष्टीने विचार करुन महाराष्ट्र दारुपासून मुक्त करावा आणि दारुचा बाजार मांडण्याच्या विचाराला परावृत्त करावे अशी सामान्य माणसाची अपेक्षा आहे.





प्रासंगिक
बाळासाहेब बडवे
(संपादक)
मो.नं.7028543453

**बार्शी :** बार्शी तालुक्यातील बालाघाट क्षेत्रात बिबट्या, वाघ अशा वन्य प्राण्यांचा वावर वाढल्यामुळे शेतीपंपाच्या लोडशेडींगमध्ये बदल करावा. शेती पंपांसाठी विद्युत प्रवाहाची वेळ रात्री ऐवजी दिवसा करावी, अशा आशयाचे पत्र शिवसेना ठाकरे गटाचे आमदार दिलीप सोपल यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस, वन मंत्री गणेश नाईक यांना पाठवले आहे. वनमंत्री गणेश नाईक यांना कॉल करून बिबट्या आणि वाघांसंदर्भात आमदार दिलीप सोपल यांनी माहिती दिली आहे.

### समाज एक संघ ठेवून बौद्ध धम्माचे काम वाढवायचे आहे

# धम्म वाढला तर समाज एक संघ राहील- आ.खरे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** समाज एक संघ ठेवून बौद्ध धम्माचे काम वाढवायचे आहे. धम्म वाढला तर समाज एक संघ राहील असे प्रतिपादन नूतन आमदार राजू खरे यांनी केले. टाकळी सिकंदर (ता. मोहोळ) येथे आयोजित केलेल्या बौद्ध धम्म परिषद मध्ये आमदार खरे बोलत होते. सरसाबाई भागवत सोनटक्के यांनी बौद्ध विहारासाठी 2 एकर जमीन दान दिली आहे. त्या ठिकाणी बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. धम्म परिषदेचे उद्घाटन तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन भंन्ते सुमेधजी नागसेन व इतर भंन्ते आणि आमदार राजू खरे यांच्या हस्ते करून बौद्ध धम्म परिषदला सुरुवात करण्यात आली.

यावेळी अशोक स्तंभ लोकार्पण सोहळा ही संपन्न करण्यात आला. खरे यांच्या पत्नी तृप्ती खरे यांनी भंन्ते यांना चीवर परिधान केले. राजू खरे पुढे बोलताना म्हणाले की, प्रस्थापित लोकांनी या तालुक्यामध्ये या समाजाला एकत्र येऊ दिले नाही. येणारा काळ खूप कठीण आहे म्हणून समाजाने निळा झेंडा खाली एकत्र येऊन या तालुक्यांमध्ये इथून पुढे २५ वर्ष आपल्या समाजाचा आमदार राहिला पाहिजे. मी बंडखोर वृत्तीचा माणूस आहे. २५ लाख रुपयांचा निधी या जागेवर वास्तू उभा करण्यासाठी देणार आहे तर या जागेचं सुशोभीकरण करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मधून ५० लाख रुपये चा निधी देणार आहे. या जागेवर २५ कोटीचे बुद्धविहार उभा करू तसेच भिख्खू संघाने मागणी केल्याप्रमाणे या जिल्ह्यामध्ये भिख्खु संघाला राहण्यासाठी ५ एकर जमीन देणार आहे. या वेळी भीम शाहीर साहेबराव येरेकर यांच्या बुद्ध भीम गीताचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष टाकळीचे सरपंच नाना शाहू सोनटक्के होते. धम्म परिषदला मोठ्या संख्येने उपासक, उपासिका उपस्थित होते.

## सामाईक जागेतील झाडे काढण्यास विरोध केल्याने मारहाण



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** सामाईक जागेतील झाडे काढण्यास विरोध केल्याचा कारणावरून पिता-पुत्रांनी मिळून घरात घुसून शिवीगाळ व दमदाटी करीत मारहाण करून सख्ख्या भावांसह महिलेला जखमी केले. ही घटना चिकमहूद, ता. सांगोला येथे घडली. याबाबत, महेश परमेश्वर पाटील यांनी फिर्याद दिली. याप्रकरणी प्रल्हाद गणपत सरगर, दीपक सरगर, नवनाथ सरगर (सर्व रा. चिकमहूद, ता सांगोला) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा पुढील तपास पोलिस करीत असल्याचे सांगण्यात आले.

» पान १ वरुन

## जिल्ह्यात विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण...

विद्यार्थ्यांची प्रगती होते. म्हणून शिक्षणाला केंद्र व राज्य शासनाने महत्त्व दिले आहे. शिक्षणावर कोट्यावधी रुपयाचा खर्च केला जात आहे. केंद्र शासनाने नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. यामुळे मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमधील जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांचा सर्वे प्रशासनाने केला आहे. या सर्वेत विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे पुस्तक वाचण्यास सांगण्यात आले. मात्र 29 टक्के विद्यार्थ्यांना मराठी वाचता आली नसल्याचा धक्कादायक प्रकार प्रशासना समोर आला आहे. या घटनेमुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे. शिक्षण विभागाने राज्यातील सर्व जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता लवकरच सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळेमध्ये सर्वेक्षण राबविण्यात येणार आहे. यात किती विद्यार्थ्यांना मराठी भाषा वाचता येते व किती विद्यार्थ्यांना वाचता येत नाही ही बाब उघड होणार आहे.

» Selected

## विज्ञान प्रदर्शनात झरे विद्यालय प्रथम


**सोलापूर :** कोर्टी येथील छत्रपती शिवाजी विद्यालय येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन झाले. यामध्ये झरे येथील नामदेवराव जगताप विद्यालयाचा विद्यार्थी अभिजीत राऊत ९ वी ते १२ च्या गटात तालुक्यात प्रथम आला आहे. त्याची जिल्हास्तरीय प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. त्याने प्रदर्शनात स्वयंचलित सिंचन पद्धती व पाण्याचा निचरा करणारी प्रभावी पध्दती यामध्ये संशोधन करुन प्रयोग सादर केला. त्यांच्या या संशोधनाची जिल्ह्यासाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल त्याचे गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, संस्था अध्यक्ष बन्सी घाडगे यांनी अभिनंदन केले.

## विश्वासाला तडा जाऊ न देता कार्यरत राहणार



**सोलापूर :** विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे आमदार सुभाष देशमुख यांनी ग्रामस्थांशी संवाद साधण्यासाठी कारकल येथे सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी ग्रामस्थांनी दाखवलेल्या विश्वासाला तडा जाऊ न देता जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव कार्यरत राहण्याचा निर्धार असल्याचं मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी सरपंच अमोघसिद्ध देशमुख, महादेव बिराजदार, चनगोंडा हाविनाळे, नामदेव पवार, अप्पासाहेब मोटे, गुरप्पा हिंडी, सिद्धप्पा हंजगी आदी उपस्थित होते.

## स्वामी समर्थ मंदिर परिसरात भूसंपादन प्रक्रिया सुरू



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** अक्कलकोटनिवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरात तीर्थक्षेत्र विकासकामांसाठी रखडलेले भूसंपादन अखेर अक्कलकोट नगरपालिकेने हाती घेतले आहे. यात ११०६२ चौरस मीटर जमीन संपादित करण्यासाठी नगरपालिकेने प्रसिद्धीकरण केले आहे. एकीकडे राज्य शासनाने अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकासकामांच्या आराखड्यास मंजुरी दिली असताना दुसरीकडे गेल्या ४० हून अधिक वर्षांपासून रखडलेले भूसंपादन करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आल्यामुळे आगामी काळात श्री स्वामी समर्थ मंदिर परिसराचा गुदमरलेला श्वास मोकळा होणार आहे.

## दर्शन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** प्रसिद्ध भाकणूककार कृष्णा महाराज ढोणे यांनी घेतले श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे उपस्थित होते.

## संतोष देशमुख यांच्या खून्याला अटक झालीच पाहिजे



**सोलापूर :** संतोष देशमुख यांच्या खुण्याला अटक झालीच पाहिजे तसेच या खून प्रकरणात वाल्मीक कराडला मुख्य आरोपी करण्यात यावे या मागणीचे निवेदन मराठा क्रांती मोर्चा सोलापूरच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना आज देण्यात आली. यावेळी संतोष देशमुख यांच्या खुण्याला अटक झालीच पाहिजे, एक मराठा लाख मराठा यासह विविध घोषणा देत जिल्हाधिकारी परिसर दणाणून सोडण्यात आला. निवेदन देताना दास शेळके, अमोल शिंदे, अनंत जाधव, श्रीकांत घाडगे, प्रताप चव्हाण, शेखर फंड, सुनील रसाळे, योगेश पवार, दिलीप कोल्हे आदी उपस्थित होते.




## एकाच्या अपहरण प्रकरणी आठजणांवर गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

» क्राईम

**मोहोळ :** गांजाच्या केससाठी झालेल्या खर्चाचे ७ लाख रुपये दिल्याशिवाय सोडणार नाही, असे म्हणत पैसे जर नाही दिले तर त्याला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी ही देऊन ७ ते ८ लोकांनी कोयत्याचा धाक दाखवून जबरदस्तीने एकाचे अपहरण केल्याची घटना २४ डिसेंबर रोजी दुपारी दीड वाजण्याच्या दरम्यान अनगर पाटीजवळ घडली. या प्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात अपहरण झालेल्या व्यक्तीच्या पत्नीने गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील ७ ते ८ महिन्यांपूर्वी राजकुमार बाळासाहेब घोलप (रा.तेलंगवाडी ता. मोहोळ ), आकाश बारटक्के, ऋषिकेश शिंदे व माळशिरस तालुक्यातील संगम येथील मिलिंद मोरे अशा चौघां विरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाणे येथे गांजाचा गुन्हा दाखल झाला होता. त्यामध्ये फिर्यादीचे पती राजकुमार घोलप व इतर लोकांना अटक झाली होती. सध्या ते सर्वजण जामीनावर बाहेरआहेत. त्यापैकी मिलिंद मोरे (रा.संगम ता. माळशिरस ) हा मागील काही दिवसांपासून राजकुमार घोलप यांना फोन करून केस दाखल झाल्यानंतर माझा ७ लाख रुपये खर्च झाला आहे, तो मला दे असे म्हणत होता. त्यावेळी राजकुमार घोलप यांनी आपल्या सगळ्यांचाच खर्च झाला आहे. माझेही त्यात नुकसान झाले आहे, आपण चर्चा करुन बघू असे म्हणत होते. परंतु मिलिंद मोरे हा ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. तो घोलप यांना वारंवार फोन करून पैशासाठी शिवीगाळ व दमदाटी करत होता. दि. २४ डिसेंबर रोजी राजकुमार घोलप व त्यांच्यासोबत त्यांचे चुलते राजकुमार विठ्ठल घोलप हे मिळून कार मधून मोहोळला कामानिमित्त आले होते. काम संपवून दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास दोघेही गावाकडे जात असताना अनगरपाटीजवळ दोन काळ्या रंगाच्या गाड्या त्यांच्या कारला आडव्या आल्या. ते पाहून राजकुमार घोलप यांनी त्यांची कार अनगररोड कडे वळवली. त्यावेळी त्या दोन्ही गाड्यांनी त्यांचा पाठलाग करत त्यांच्या गाडीला गाड्या आडव्या लावून मिलिंद मोरे रा. संगम ता. माळशिरस व ऋषिकेश शिंदे रा. तेलंगवाडी ता. मोहोळ यांच्यासह इतर पाच ते सहा लोकांनी राजकुमार घोलप यांना कोयत्याचा धाक दाखवून जबरदस्तीने त्यांचे अपहरण केले, असल्याची फिर्याद त्यांच्या पत्नी विद्या राजकुमार घोलप यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात दिली असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक केसरकर करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीस फूस लावून पळविले



**बार्शी :** बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागातून एका १४ वर्षीय अल्पवयीन तरुणीस अज्ञात कारणावरून फूस लावून पळवून नेल्याप्रकरणी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, अल्पवयीन मुलगी इयत्ता नववी मध्ये शिकत आहे. गावात शाळा चौथीपर्यंतच असल्याने तिला दररोज एसटीने बाहेरगावी जावे लागत आहे. त्यावेळी त्यांना खात्री झाली की, आपली मुलगी कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून फूस लावून पळून नेले आहे.




### संविधान सन्मान समिती मोहोळ तालुका व सकल मराठा समाज यांच्यावतीने

# मोहोळ तहसील कार्यालयावर मोर्चा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या अवमानकारक विधानाबद्दल त्यांनी राजीनामा द्यावा, परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची मदत द्यावी, त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला शासकीय सेवेत घ्यावे, संतोष देशमुख यांच्या खुनाची एसआयटी मार्फत चौकशी करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी या मागण्यासाठी संविधान सन्मान समिती मोहोळ तालुका व सकल मराठा समाज मोहोळ यांच्या वतीने तहसील कार्यालयावर गुरुवारी(दि.२६ रोजी) निषेध मोर्चा काढण्यात आला.

मोर्चाला चैत्यभूमी पासून आरंभ करण्यात आला. मुख्य रस्त्याने घोषणा देत मोर्चा शिवाजी चौकात आला, तेथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून परत हा मोर्चा तहसील कचेरी आवारात आला. त्यावेळी बोलताना अ‍ॅड विनोद कांबळे म्हणाले, पोलीस प्रशासन एका गरोदर महिलेला मारण्या इतपत खालच्या पातळीवर गेले नाही, मात्र पोलिसांच्या वेशात आलेल्यांनी हे सुनियोजित कृत्य केले आहे. परभणी येथे पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन राबवल्या मुळे अनर्थ घडला आहे.

अ‍ॅड श्रीरंग लाळे म्हणाले की, स्व. संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या अंगावरील प्रत्येक काठी ही संविधानावरील केलेला हल्ला आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या ब्रीदवाक्यप्रमाणे एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे." यावेळी मंगेश पांढरे, संगीता पवार, जिब्राईल शेख, पांडुरंग माने, बिलाल शेख, रमेश बारसकर यांनी मनोगत व्यक्त केली. मोर्चात डॉ प्रमोद पाटील, मोहोळ तालुका काँग्रेसच्या कार्याध्यक्षा रतन कसबे पांडुरंग खांडेकर, पप्पू पाटील, मनोज नागणे,नाना हावळे, रियाज शेख, बाबूराव ढाणके, राजू नागटिळक, युसुफ बागवान, युवराज रणदिवे, विकी कांबळे, विकास बनसोडे, सोमनाथ पवार, जितेंद्र अष्टुळ, संतोष कसबे,प्रवीण कापुरे, सतीश कसबे, सोमेश बनसोडे, बाळू सोनवणे, दादा कापुरे, यांनी सहभाग नोंदविला.निवेदन तहसीलदार सचिन मुळीक आणि नूतन पोलीस निरीक्षक हेमंत सोडगे यांनी स्वीकारले.

पंढरी संचार

# भुजबळांपुढील पर्याय

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांना राज्य मंत्रिमंडळात त्यांच्या गटाकडून संधी मिळू शकलेली नाही, तेव्हापासून ते आणि त्यांचे समर्थक खूप अस्वस्थ आहेत. भुजबळ हे काही लेचेपेचे नेते नाहीत. त्यामुळे मंत्रिमंडळातून डावललं गेल्यानंतर, ते असे सहज गुपचूप बसून राहतील अशी शक्यता नव्हती. तरीही अजित पवार यांनी भुजबळ यांना वगळण्याचे धाडस दाखवले. हे धाडस अजित पवार यांना जड जाण्याची चिन्हे दिसत आहेत. अजित पवार यांच्या वाट्याला जी काही अल्प मंत्रिपदे आली, त्यात त्यांनी दिलीप वळसे पाटील यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यालाही वगळले आहे. पण दिलीप वळसे पाटील निमूट राहिले. तथापि, छगन भुजबळ मात्र दिवसेंदिवस अधिकच आक्रमक होताना दिसत आहेत. आपली नाराजी प्रसारमाध्यमांपुढे ते अधिक प्रकर्षाने मांडत आहेत. नुसती खंत किंवा नाराजी व्यक्त करण्यापुरते ते मर्यादित राहिलेले नाहीत, तर अधिक आक्रमकपणे अजित पवार यांना ते सवाल विचारत आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की विधानसभा निवडणुकीच्या आधीच आपण लोकसभा निवडणूक लढवण्याची तयारी केली होती, पण त्यावेळी आपली राज्यात अधिक गरज आहे असे सांगून आपल्याला लोकसभा निवडणुकीतून माघार घ्यायला लावली. त्यानंतर आपल्या पक्षाने आपल्याला राज्यसभा देण्याची तयारी दर्शवली, त्यालाही आपण होकार दिला होता; पण तेथेही आपल्याला डावलले गेले आणि आज मंत्रिपद डावलले गेल्यानंतर पुन्हा आपल्याला राज्यसभेवर पाठवण्याचा प्रस्ताव दिला गेला आहे, असा तपशील भुजबळ यांनी अलीकडेच एका मुलाखतीत सांगितला आहे. त्याच मुलाखतीत अजित पवार यांच्याविषयी अत्यंत स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त करताना भुजबळ यांनी म्हटले आहे की, पहाटेच्या शपथविधीनंतर अजित पवार यांच्याविषयी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अनुकूल वातावरण नसतानाही आपण अजित पवार यांना उपमुख्यमंत्री करण्याचा आग्रह धरला होता. आता तरुणांना संधी देण्याचे कारण दाखवून आपल्याला डावलले जात असेल, तर आपल्याला विधानसभा निवडणुकीचे तिकीटच त्यांनी द्यायला नको होते, अशी उद्विग्नताही त्यांनी व्यक्त केली आहे. ६७ वर्षांचे अजित पवार हेही आता काही तरुण राहिलेले नाहीत, असा टोमणाही मारायला भुजबळ विसरले नाहीत. त्यांची ही सगळी वक्तव्यं पाहिल्यानंतर ते आता बहुधा पक्षातून बाहेर पडायच्या मनस्थितीत असावेत असा कयास बांधला जात आहे. त्यांच्या समर्थकांचे अनेक मेळावे या मधल्या काळात झाले. त्यात त्यांच्या समर्थकांनी भुजबळ यांना अजित पवार गटाच्या पक्षातून राजीनामा देण्याचा आग्रह धरला आहे. छगन भुजबळ यांनी स्वतंत्र पक्ष काढावा असा आग्रहही त्यांचे समर्थक धरत आहेत. त्याच वेळेला काही जणांनी भुजबळ यांना भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा सल्ला दिला आहे. या सगळ्या प्रस्तावांवर भुजबळ विचार करीत आहेत. त्यातून ते कोणता निर्णय घेतील याचा अंदाज अजून लागत नसला, तरी आज भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची बातमी आली आहे. आपल्या संदर्भात फडणवीस येत्या दहा-बारा दिवसांत निर्णय घेतील अशी माहिती भुजबळ यांनी दिली आहे. त्यामुळे सध्याचा सारा रागरंग भुजबळ हे अजित पवार यांना सोडून भारतीय जनता पक्षाची वाट धरतील असाच दिसतो आहे. भुजबळ यांचा राज्यातील ओबीसी समाजावर मोठा पगडा आहे. या समाजासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला असून त्यांच्या इतका ताकदवर ओबीसी नेता राज्यात दुसरा नाही. त्यामुळे भुजबळांसारखा दमदार ओबीसी नेता आपल्याला मिळाला, तर त्याचा राजकीय लाभच आपल्याला होईल असाही भाजपचा विचार असू शकतो. त्यामुळे हे समीकरण जुळवून येण्याचीच शक्यता सध्या अधिक दिसते आहे. वयाच्या या टप्प्यात स्वतंत्र पक्ष काढणे ही मोठीच जिकिरीची बाब आहे. त्यामुळे हा अवघड मार्ग स्वीकारण्यापेक्षा भाजपच्या वळचणीला जाऊन सत्तेचा सोपा मार्ग स्वीकारणे हा पर्याय भुजबळ स्वीकारू शकतात. भुजबळ यांची राजकीय कारकीर्द शिवसेनेतून सुरू झाली. शिवसेना ही हिंदुत्ववादी विचारांची संघटना होती. त्या संघटनेचे निष्ठावान पाईक म्हणून राजकारणात नाव कमावल्यानंतर त्यांनी अचानक पुरोगामी विचाराचा वारसा उचलून धरत पक्षांतर केले. पहिल्यांदा ते काँग्रेसमध्ये गेले. तेथे मंत्रिपद उपभोग झाल्यानंतर काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या शरद पवार यांचे बोट धरून ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. अलीकडच्या काळात शरद पवारांची साथ सोडून ते अजित पवार यांच्याबरोबर गेले. आता पुन्हा ते एका वेगळ्या वळणावर उभे आहेत. पक्ष बदलणे किंवा हिंदुत्ववादी विचारसरणीकडून एकदम पुरोगामी विचारसरणीचा स्वीकार करणे हे त्यांच्यासाठी फार नवे नाही. पण प्रश्न असा आहे की, आज वयाच्या या टप्प्यावर केवळ एका मंत्रिपदासाठी इतका मोठा आटापिटा करणे त्यांच्यासारख्या धडाकेबाज प्रतिमेच्या नेत्याला कितपत शोभणारे ठरेल, याचा विचार व्हायला हवा. ज्या फडणवीसांच्या नेतृत्वाचे बोट आज ते धरण्याच्या विचारात आहेत त्याच फडणवीसांच्या काळात भुजबळ यांना काही वर्षे तुरुंगवास भोगावा लागला होता ही घटना लोकांच्या विस्मरणातून अजून गेलेली नाही. पण आजच्या एकूणच राजकीय स्थितीला जे बेभरवशाचे किंवा बेदीलीचे स्वरूप आले आहे त्या वातावरणात कोणत्याही ज्येष्ठ नेत्याचा कोणत्याही पक्षाकडे ओढा असणे किंवा कोणत्याही विचारसरणीला सहज तिलांजली देऊन नेमक्या विरुद्ध विचारसरणीचा तितक्याच सहजतेने अवलंब करणे याला आता फार महत्त्व राहिलेले नाही. किंबहुना असल्या बाबींचा आता कोणी मुलाहिजा बाळगताना दिसत नाही.

> एका जनमत पाहणीनुसार गेल्या महिन्यापासून अध्यक्ष यून यांची लोकप्रियता २५ टक्क्यांनी घसरली होती. ती सावरण्यासाठी त्यांनी हा अनाठायी प्रपंच केला व मार्शल लॉची घोषणा केली आणि अखेर त्यांना कोलांटउडी घेऊन आदेश रद्द करावा लागला. ही फरफट त्यांची प्रतिमा आणखी बिघडवणारी ठरली. दक्षिण कोरियातील नेत्यांनी शांतता व विवेकभाव जागृत ठेवला तर तेथील राजकीय व्यवस्था या वादळातून सुखरूप बाहेर पडू शकेल.

# दक्षिण कोरियात नेमके काय घडले?

**डॉ. वि. ल. धारूरकर**

दक्षिण कोरियाच्या लोकशाही जीवनात अस्थिरतेचे ढग जमा झाले आहेत. अध्यक्षांनी मार्शल लॉ घोषित केला आणि लोकांमधून कमालीचा असंतोष व्यक्त होऊ लागला. शेवटी लोकक्षोभासमोर राजसत्तेने लोटांगण घातले आणि मार्शल लॉ मागे घेण्यात आला. पण एवढ्याने संकट संपले नाही. देशाच्या राजकीय जीवनात संकटे उद्भवली की एकत्र नव्हे तर सलगपणे अनेक संकटे एकानंतर एक मालिकेसारखी येतात. या सत्याचा प्रत्यय सध्या दक्षिण कोरियात येत आहे. बाहेर लोक प्रक्षुब्ध आणि संसदेत विरोधक कमालीचे संतप्त या पार्श्वभूमीवर ६ तासात मार्शल लॉ मागे घ्यावा लागलाच. पण आता विरोधी पक्ष अध्यक्ष महोदयांवर महाभियोग चालविण्याच्या तयारीत आहेत. राष्ट्राध्यक्षांविरुद्ध महाभियोगाच्या तयारीचे वेध लागले आहेत आणि त्यांच्या सिंहासनाला धोका निर्माण झाला आहे. या सर्व राजकीय घडामोडी, क्रिया-प्रतिक्रिया, तिचे संभाव्य परिणाम या सर्व बाबींची मिमांसा करणे अगत्याचे आहे.

**धोका आणि धक्का:**

दक्षिण कोरियाच्या अध्यक्षांनी केलेली मार्शल लॉची घोषणा म्हणजे तेथील लोकशाहीला धोका निर्माण झाला आणि उभ्या जगाला अचानक हे कसे घडले याचा धक्काही बसला. दक्षिण कोरियाचे अध्यक्ष यून सुक येओल यांचे भवितव्य आता टांगणीला लागले आहे. त्यांच्या पुढे अनेक यक्ष प्रश्नांची मालिका उभी राहिली आहे. अध्यक्ष महोदयांनी मार्शल लॉ घोषित केला आणि लोक आश्चर्यचकित झाले. पण लोकांचा दबाव वाढल्यामुळे आपला निर्णय चुकला की काय असे त्यांना वाटू लागले आणि ६ तासात त्यांनी मार्शल लॉ मागे घेतला. आता दक्षिण कोरिया अशांतता, अस्थिरता आणि गोंधळजनक परिस्थिती यामध्ये बुडालेला आहे. त्यातून हा देश कसा बाहेर पडेल याची चिंता वाटू लागली आहे. त्यांच्यावर अविश्वास ठराव आल्यास व महाभियोग मंजूर झाल्यास त्यांना पायउतार व्हावे लागेल. मागील आठवड्यात स्थानिक दूरचित्रवाणीवरून देशाला संबोधित करताना अध्यक्ष महोदयांनी आपल्या पत्नीच्या चुकांबद्दल चक्क माफी मागितली. चैनीची हँडबॅग स्विकारणे आणि स्टॉक मॅन्युप्युलेशन करणे इत्यादी आरोपात त्यांच्या पत्नीवर टीका झाली होती. त्यामुळे पतिराजालाही जनतेपुढे क्षमायाचना करावी लागली. अध्यक्ष महोदय एका विचित्र चक्रव्यूहात सापडले आहेत आणि विरोधी पक्षाने त्यांना कोंडीत पकडले आहे. आंदोलन पेटले की त्यात ओले व सुके दोन्हीही जळते. आता त्यांच्या विरोधात वातावरण तापत आहे.

**जुगार कसा उलटला:**

अध्यक्ष यून महोदयांनी मार्शल लॉ मोठ्या ऐटीत घोषित केला. त्यांना असे वाटले की, त्यामुळे प्रक्षुब्ध जनमत दाबून टाकता येईल आणि आपली सत्ता तहहयात पुढे चालविता येईल. पण मार्शल लॉचा हा जुगार त्यांच्याच अंगावर उलटला. विरोधी डेमोक्रॅटिक पक्षाचे काही मुखंड नेते उत्तर कोरियाशी चोरून हातमिळवणी करीत आहेत असा संशय त्यांना वाटला. तसे झाले तर दक्षिण कोरियाचे अस्तित्व संपुष्टात येईल या भयाने त्यांनी मार्शल लॉ पुकारला. खरेतर, युद्ध, हिंसाचार यासारखे गंभीर कारण घडले नव्हते. तरीही आपल्या अस्तित्वासाठी अध्यक्षांनी ही खेळी केली. ते लोकांना पटले नाही. त्यांची काही जुनी कुलंगडी, त्यांच्या होम मिनिस्टरची प्रकरणे आणि त्यांच्या कारकीर्दीतील काही गैरव्यवहार यामुळे लोकक्षोभ खूपच वाढला आहे असे पाहून त्यांनी यू-टर्न घेतला आणि मार्शल लॉ मागे घेण्याची नाट्यमय घोषणा केली. त्यामुळे सारेच चकित झाले नसतील तर नवल!

दक्षिण कोरियात अंतर्गत परिस्थिती हाताबाहेर गेल्यास आपत्कालीन परिस्थितीत मार्शल लॉ घोषित करता येतो अशी तरतूद घटनेच्या ७७ व्या कलमात आहे. मार्शल लॉ म्हणजे जणू तेथील आणीबाणीची परिस्थिती. अशी घोषणा करण्यापूर्वी अध्यक्ष महोदयांनी परिस्थिती तेवढी हाताबाहेर गेली आहे का? मार्शल लॉ घोषित करणे योग्य होईल का? इत्यादी गोष्टींचा गांभीर्याने विचार करायला पाहिजे होता, तसा त्यांनी केला नाही. त्यामुळे ते कमालीचे गोंधळात सापडले. तेथील कायद्यानुसार मार्शल लॉ घोषित झाल्यानंतर मेळावे, निदर्शने, मोर्च यावर बंदी घातली जाते. संप, टाळेबंदी या गोष्टी करता येत नाहीत. कामगारांना संप आणि निदर्शने करता येत नाहीत. प्रसार माध्यमांवरही निर्बंध लादले जातात. वृत्तपत्रे, मासिके यांच्या प्रकाशनावर प्रसिद्धीपूर्व निर्बंध येतात. महत्त्वाचे म्हणजे कोणतेही वॉरंट न दाखविता कोणालाही अटक करता येते. या सर्व भयानक तरतुदींमुळे मार्शल लॉ जाचक आणि लोकांना प्रतिबंधित करणारा वाटतो.

**सभागृहात नामंजूर:**

अध्यक्षांनी केलेली मार्शल लॉची घोषणा दक्षिण कोरियाच्या नॅशनल असेंब्ली या सर्वोच्च सभागृहाने ३०० पैकी १९० मतांनी म्हणजे बहुमताने फेटाळून लावली. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास विधिमंडळात हा ठराव आला. १९० सदस्यांनी तो ठराव रद्द करण्याच्या बाजूने मतदान केले. यावरून अध्यक्षांच्या विरोधात सदस्यांच्या भावना किती तीव्र होत्या हे लक्षात येते. २ तासांनी साडेचार वाजण्याच्या सुमारास अध्यक्ष यून यांनी आपण मार्शल लॉ मागे घेतल्याची घोषणा केली. दोन तासाच्या आत दक्षिण कोरियातील मार्शल लॉ जाहीर झाला आणि ६ तासांनी मागे घेण्यात आला. हे सारे चमत्कारिक आहे. २१ व्या शतकात कोरियामध्ये हे घडावे हा प्रकार तेथील लोकशाहीला मोठा लाजिरवाणा असा आहे. यामुळे दक्षिण कोरिया पूर्णपणे हादरला आणि त्यांना धक्काही बसला. लष्कर सभागृहाला विळखा घालीत होते. काही सैन्य हेलिकॉप्टरद्वारे सभागृहाच्या इमारतीवर उतरले होते. परंतु त्याची पर्वा न करता ६ पक्षांच्या विरोधी आघाडीने १९२ संख्याबळाने मार्शल लॉ एका ठरावाद्वारे हाणून पाडला. संसदेत विरोधी ठराव मंजूर झाल्यानंतर लोक संसदेकडे जाण्यासाठी गर्दी करू लागले. त्यावेळी दक्षिण कोरियाचे पोलीस अध्यक्ष यून यांच्या सुरक्षिततेसाठी चौकशी करीत होते. अध्यक्ष महोदयांच्या धरसोडपणामुळे आणि गोंधळलेल्या मनःस्थितीमुळे दक्षिण कोरिया संकटात सापडला आहे.

दक्षिण कोरियाच्या सभागृहात विरोधी पक्ष असलेल्या डेमोक्रॅटिक पक्षाचे बहुमत आहे. ६ पक्षांच्या आघाडीने १९२ मतांनी मार्शल लॉ रद्द करण्याचा ठराव संमत केला. त्यामुळे अध्यक्षांचा फुसका बार झाला. आता आणखी ८ सदस्यांनी जर पाठिंबा दिला तर ३०० च्या सभागृहात दोन तृतीयांश मतांनी महाभियोगाचा ठराव मान्य होईल आणि यून यांच्यावर राजीनाम्याची पाळी येईल. असे म्हणतात की, खुद्द अध्यक्षांच्या पक्षातही मार्शल लॉच्या विरोधात काही खासदार आहेत. जर अशा ८-१० लोकांनी विरोधी मतदान केले तर अध्यक्ष महोदयांवर गंडांतर येऊ शकते. महाभियोगाचा ठराव मान्य झाल्यानंतर अध्यक्षांना तेथील घटनेनुसार चौकशीसाठी ९ जणांच्या घटनापीठासमोर हजर रहावे लागते. त्यापैकी ६ जणांनी संमती दिली तर अध्यक्षांची गच्छंती अटळ होते. अध्यक्षांविरोधात महाभियोगाचा ठराव मंजूर झाल्यास पंतप्रधानाकडे कार्यकारी अध्यक्षपद जाते. चौकशीअंती त्यांच्या यशपयशाचा लेखाजोखा समोर येईल आणि ६ सदस्यांनी त्यांच्या विरोधात मत दिले तर अध्यक्षांना पेरते व्हावे लागेल. अशा प्रकारची तेथील महाभियोगाची तरतूद मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे.

अध्यक्ष महोदयांच्या सत्ताधारी आघाडीने सभागृहात बहुमत गमावले आहे. पण महाभियोग मान्य होण्यासाठी दोन तृतीयांश म्हणजे २०० सदस्यांची गरज आहे. विरोधी आघाडीला ८ खासदार कमी पडतात. सत्ताधारी पक्षाचे असंतुष्ट ८ जण फुटले तर अध्यक्ष महोदयांची डाळ शिजेल असे वाटत नाही. संसदेत बजेट मान्य झाल्याशिवाय देशाचा कारभार चालणे कठीण आहे. तो ही एक वैधानिक पेचप्रसंग आहे. राष्ट्राध्यक्ष यून यांची आणखी कोंडी कशात असेल तर त्यांच्या विरोधात कामगारांनी दिलेली बेमुदत संपाची नोटीस होय. मागील फेब्रुवारीपासून देशातील डॉक्टर मंडळी दीर्घ संपावर आहेत आणि त्यामुळे आरोग्य व्यवस्था साफ कोलमडली आहे. २२ बड्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर त्यांनी महाभियोग दाखल केला होता, ही घटना सुद्धा अविश्वास वाढविणारी ठरली. रात्री ११ वाजता टेलिव्हिजनवर केलेल्या भाषणात अध्यक्ष महोदयांनी डेमोक्रॅटिक पक्ष हा विरोधी पक्ष उत्तर कोरियाबरोबर हातमिळवणी करीत आहे आणि देशाच्या विरोधात काम करीत आहे असा शोध लावला. नॅशनल असेंब्लीच्या छतावर हेलिकॉप्टर उतरवून तेथे सैन्य पाठविण्याची कारवाई चुकली. त्यामुळे सरकारची हुकूमशाही प्रवृत्ती दिसून आली. विरोधी पक्ष नेते ली जे-म्युंग यांनी १९० खासदारांना एकत्र करून विरोधी मतदान घडवून आणले हे त्यांचे संघटन चातुर्य मानले पाहिजे. घोषणा केल्यापासून ६ तासांनी मार्शल लॉ माघारी घेणे ही त्यांची व देशाचीही नामुष्की ठरली. खरेतर, देशावर कोणी आक्रमण केल्यास खूपच स्फोटक परिस्थिती निर्माण झाली असेल तर मार्शल लॉ जाहीर करता येतो. परंतु अध्यक्ष यून यांनी किरकोळ कारणावरून मार्शल लॉ जाहीर करण्याची घाई का केली? हे कळत नाही. आशियातील राजकारण अलिकडे इस्त्राईल-हमास युद्धानंतर अस्थिर बनत असताना त्यात आणखी एका नव्या संकटाची भर पडत आहे हे लक्षात घेऊन, दक्षिण कोरियातील नेत्यांनी शांतता व विवेकभाव जागृत ठेवला तर तेथील राजकीय व्यवस्था या वादळातून सुखरूप बाहेर पडू शकेल.

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**शुक्रवार, दिनांक २७ डिसेंबर २०२४.** मार्गशीर्ष कृ. १२, विशाखा, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, उत्तरायण, हेमंत ऋतू. स्वामी स्वरुपानंद जयंती, पावस, जि. रत्नागिरी. **नक्षत्र :** विशाखा, योग : धृति, करण : कौलव

**सूर्योदय** : स.०६.५१ सूर्यास्त : सायं.०५.३८ वा.

**राहू काळ : राहू काळ :दुपारी : १:३० ते ३:००**

**दिनविशेष**

▶१९९६ : प्रसिद्ध बंगाली लेखिका महाश्वेता देवी यांना ज्ञानपीठ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ▶१७९७ : उर्दू कवी गालिब यांचा जन्म. ▶१८९८ : विदर्भात शिक्षणाचा प्रसार करणारे सामाजिक कार्यकर्ते व माजी केंद्रीय कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म. ▶१८२२ : देवीची लस शोधणारे शास्त्रज्ञ लुई पाश्चर यांचा जन्म.

**राशीभविष्य**

▲**मेष** : सरकारी कामासाठी खर्च होईल. ▲**वृषभ** : शारीरिक सौख्य कमी राहील. ▲**मिथुन** : कामासाठी प्रवास घडेल. ▲**कर्क** : कष्टाच्या मानाने लाभ कमी होईल. ▲**सिंह** : धार्मिक कामात लक्ष घालाल. ▲**कन्या** : मनोबल कमी राहील. ▲**तुळ** : कला, क्रीडा क्षेत्रात यश मिळेल. ▲**वृश्चिक** : जबाबदारी वाढले. ▲**धनु** : खूप महत्त्वाकांक्षी राहाल. ▲**मकर** : कामाचा कंटाळा असेल. ▲**कुंभ** : मित्रांचा सहवास लाभेल. ▲**मीन** : धंद्यात उलाढाली संभवतात.

**चिंतन**

विधाता मोठमोठ्या साम्राज्यापासून विन्मुख होऊ शकतो, पण इवल्याशा फुलापासून त्याला विन्मुख होता येत नाही. तसेच सूर्यदेवतेचा प्रकाश जेव्हा काळ्या ढगांना स्पर्श करतो, तेव्हा तो स्वर्गाचे फूल बनवितो.

**– रवींद्रनाथ टागोर**



रोजच्या व्यवहारात आपण कळत नकळत खूप चुका करतो. त्यामुळे आपल्याला दैनंदिन जीवनांत खूप त्रास होतो. माणसाला परमेश्वराचे ज्ञान झाले, म्हणजे त्याचा अभिमान नाहीसा होतो व त्याची चित्तवृत्ती स्थिर राहते. हीच समाधी. आकाशात कोणी जाऊ शकत नाही. दुसरा कोणी आपण जाऊन मृताशी बोललो, असेही कोणी सांगत नाही. थोडक्यात, आकाशात कोणी जात-येत नाही. **– चाणक्यनीती**

**व्यक्तीविशेष**

### कवी मिर्झा गालिब

प्रख्यात उर्दू कवी मिर्झा गालिब यांचा जन्म २७ डिसेंबर १७९७ रोजी आग्रा येथे झाला. या कवीचे मुळ नाव होते मिर्झा असदुल्लाखान. सांप्रदायिक भेदभावांना मुळीच थारा न देणाऱ्या गालिबने उर्दू आणि फार्सीत काव्यरचना केली. स्वांतत्र्ययुद्धाची कहाणी लिहिली. नमुनेदार पत्रे लिहिली. आशावाद, उदारमतवादी आणि मानवतावादी असे त्यांचे काव्य रसिकांच्या हृदयाला जाऊन भिडे. अभिजात साहित्य, व्याकरण, इतिहास, तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र इत्यादी अनेक विषयांचा त्यांचा अभ्यास होता. अखेरच्या काळात ते मुघल दरबाराचे राजकवीही झाले. कवितेला सार्थक कला मानणारा, वेदनेचे गाणे गाणारा हा 'शायर' समकालीनापेक्षा वेगळी काव्यरचना करणारा हा 'गालिब' आकाशातील नक्षत्रफुलांना गवसणी घालणारी कल्पना, विकासाची भरारी त्यांच्या प्रेमकाव्यात दिसते. सौंदर्य, मिलनाची आसक्ती, हूरहूर आणि आत्मसमर्पणाची भावना त्याने आपल्या काव्यात शब्दबद्ध केली. अशा कवींचे १५ फेब्रुवारी १८६९ रोजी निधन झाले.

**बोधकथा**

### दुसऱ्याच्या कामात उठाठेव करू नये

कुत्र्याचे हे बोलणे गाढवाला आवडले नाही. ते म्हणाले, 'अरे मालकावर संकट आले असताना जो सेवक त्याला मदत करत नाही तो पापाचा भागीदार ठरतो.'

त्यावर कुत्रा म्हणाला, 'आपल्या सेवकांकडे लक्ष न देणारा मालकही पापीच ठरतो.' गाढव म्हणाला, 'ठीक आहे. तुझं तुझ्यापाशी. मी मात्र मोठ्याने ओरडून मालकाला जागे करणार.' असे म्हणून गाढव जोरजोरात ओरडू लागले.

अवेळी ओरडणाऱ्या गाढवाचा मालकाला खूप राग आला. रागात उठून त्याने हातात काठी घेतली आणि गाढवाला खूप बदडू लागला. या गडबडीत चोर मात्र पळून गले. बिचाऱ्या गाढवाला भरपूर चोप बसला. मालक पुन्हा झोपायला गेल्यानंतर कुत्रा गाढवाला म्हणाला, 'काय, कळले ना मालकाचे किती प्रेम आहे ते.' त्यावर गाढव म्हणाले, 'होय रे बाबा, चांगलाच धडा शिकलो. दुसऱ्याच्या कामात उगाच ढवळाढवळ करू नये. अन्यथा, आपली अवस्था गाढवासारखी होते.' (उत्तरार्ध)

**जिज्ञासा**

### सॅकरीनचा शोध

कुठलेही रासायनिक, जीवशास्त्रीय प्रयोग करताना हात पूर्णपणे झाकलेले असतात किंवा ते हात तोंडात, डोळ्यात जाणार नाहीत याची पूर्णपणे काळजी घेतली जाते. कारण तयार होणाऱ्या वेगवेगळ्या रसायनांचे गुणधर्म सुरुवातीला कोणाला माहित नसतात. त्यामुळे अपाय होण्याची शक्यताही असते. पण काही वेळा अनावधनाने एखाद्या वेगळ्याच पदार्थाचा शोध यातून लागू शकतो. सॅकरीनच्या शोधाची देखील अशीच एक कथा आहे. इरा रेमसन या रसायन शास्त्रज्ञांनी कॉस्टंटटाईन फाहलर्बग या आपल्या विद्यार्थ्यासोबत प्रयोगशाळेत एक नवे रासायनिक संयुग तयार केले होते. प्रयोगशाळेतून बाहेर पडताना रोज ते हात स्वच्छ साबनाने धुवत असत. परंतु, त्या दिवशी नकळतपणे फाहलर्बग याने आपला हात ओठांवरून फिरवला. नंतर त्याने जीभ ओठांवरून फिरवल्यानंतर त्याला गोड चव लागली. (पूर्वार्ध)

**सामान्यज्ञान**

### काळा समुद्र

इस्तंबुल हे तुर्कस्तानमधील सर्वात मोठे शहर याच समुद्राच्या काठावर वसलेले आहे. काळा समुद्र ही एक बाह्यप्रवाही जलराशी आहे. म्हणजेच प्रत्येक वर्षी येऊन मिळणाऱ्या एकूण पाण्यापेक्षा साधारण ३०० घन किलोमीटर इतके जास्त पाणी काळ्या समुद्रातून बोस्फोरस आणि दार्दनेलस सामुद्रधुनीमार्गे एजियन समुद्रात जाते. काळ्या समुद्रातून बाहेर पडणारे जास्त थंड आणि कमी खारट पाणी हे भूमध्य समुद्रातून काळ्या समुद्रात येणाऱ्या पाण्याच्या वर तरंगते, त्यामुळे पाण्यात खोलवर ऑक्सिजन अभावित पाण्याचा स्तर तयार होतो. (समाप्त)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५४२**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 1 |
| | 4 | | |
| 4 | 3 | 1 | 2 |
| | | | |

**क्रमांक ५४१ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 2 | 4 | 1 |
| 1 | 4 | 3 | 2 |
| 2 | 3 | 1 | 4 |
| 4 | 1 | 2 | 3 |

**हास्यविनोद**

संताचे लग्न झाले. तो हनिमूनला गेला. तो इतका गोंधळला होता की त्याला कळतच नव्हते की काय बोलायचे. शेवटी तो धाडस करून बायकोला म्हणाला, तुझ्या घरच्यांना माहीत आहे का की, तू इथे माझ्याबरोबर फिरायला आली आहेस ते...?



— — — — — — — — — —

एक तरुण सुंदर मुलगी एकटीच रेस्तराँमध्ये बसली होती. एक ऐटबाज तरूण तिच्याजवळ आला आणि म्हणाला, मॅडम आपल्यासाठी काय ऑर्डर करू?
ती म्हणाली, एक कॉफी आणि मलमपट्टी.
त्या तरूणाने गोंधळून तिच्याकडे पाहिले. ती म्हणाली, समोरून माझे डॅडी येत आहेत.

**महिलायन**

### आरोग्य मुलांच्या दातांचं

घरात लहान मुलं असतील तर त्यांच्या आरोग्याच्या बाबतीत सतर्क राहणं हे प्रत्येक आईचं कर्तव्य आहे, हे वेगळं सांगायला नकोच. मुलांना जेवण देणं, त्यांना पौष्टिक आहार देणं इत्यादी गोष्टींबाबत आपण सतर्क असतोच. पण काही छोट्या छोट्या गोष्टींकडे मात्र आपलं दुर्लक्ष होतं. मुलांचे दात हा यातीलच एक प्रकार आहे. त्यांचे दात स्वच्छ आणि सामान्य असावेत, भविष्यात त्याबाबतीत कोणत्याही समस्या निर्माण होऊ नये म्हणून मुलांच्या दातांकडे लहानपणापासूनच लक्ष देणं आवश्यक आहे. मुलं तर निरागस असतात. ती आपल्या दातांची काळजी घेऊ शकत नसतात. त्यामुळे त्याकडे आपणच सुरुवातीपासून लक्ष देणं गरजेचं आहे. हे करतानाच मुलांनाही दातांची काळजी कशी घ्यावी, हेदेखील शिकवता येईल. त्याकडे दुर्लक्ष झालं तर त्यामुळे भविष्यात गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. मुलं ज्यावेळी बाटलीने दूध पित असतील त्यावेळी ती बाटली ब्रशने चांगल्या पद्धतीने साफ करुन पाण्यामध्ये उकळून घ्यावी आणि नंतरच त्या बाटलीने मुलांना दूध पाजावं. मुलं झोपली असतील तर अशावेळी त्यांच्या तोंडात कधीही दुधाची बाटली देऊ नये. मुलांनी दूध प्याल्यानंतर एखाद्या स्वच्छ, नरम अशा ओल्या कपड्याने त्याचं तोंड, जीभ साफ करावी. सहा वर्षांपेक्षा लहान मुलांना फ्लोराईडयुक्त टूथपेस्ट वापरायला देऊ नये. आजकाल अनेक मुलांना टॉफी, चॉकलेट, च्युईंग गम, त्याचप्रमाणे इतर गोड वस्तू खाण्याची सवय असते. पण त्यामुळे मुलांचे दात खराब होऊ शकतात. त्यामुळे असे पदार्थ मुलं कमीतकमी खातील याकडे लक्ष द्यावं. जेव्हा मुलांना पहिला दात येतो त्यावेळेपासून तुम्ही दातांना ब्रशिंग करु शकता. मुलांसाठी अतिशय मऊ ब्रश बाजारात उपलब्ध आहेत. अशा दातांनीच मुलांच्या दातांना ब्रश करावा. हा ब्रश पुढच्या बाजूने पातळ आणि आकाराने छोटा असेल याकडे लक्ष द्यावं. (पूर्वार्ध)

**गंमतग्यान**

### चुंबकीय क्षेत्राबद्दल जाणणारा शार्क

समुद्रात राहणाऱ्या माशांपैकी डॉल्फीन या माशाला सर्वाधिक संवेदनशील मानले जाते. मात्र सर्वाधिक शक्तीशाली असणारा शार्क मासाही यामध्ये मागे नाही. समुद्री जीवशास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार पृथ्वीवरील चुंबकीय क्षेत्रात होणाऱ्या सूक्ष्म हालचालींची माहिती शार्क मॅग्नेटोमीटरप्रमाणे जाणून घेतो. शार्क समुद्रात सरळ रेषेत हजारो किमीचा प्रवास करतो ही गोष्ट शास्त्रज्ञांना अचंबित करणारी होती. त्यामुळे याबद्दलचा शोध घेण्यासाठी बरेच वर्ष प्रयत्न करण्यात आले. यासाठी हवाई विद्यापिठाच्या शास्त्रज्ञांनी एक शार्क पकडून त्याला प्रशिक्षित केले. प्रशिक्षणादरम्यान जेव्हा कधी त्याच्यात तलावातून कृत्रिम चुंबकीय क्षेत्र सक्रीय केले जात होते त्यावेळी शार्क पोहून आपल्या लक्षापर्यंत पोहोचत असे. यामुळे त्यांना समजले की शार्कला दिशेचा बोध होतो आहे. भौतिक शास्त्रिय भाषेत याला कंपास सेन्स म्हटले जाते. या प्रयोगामुळे शार्क माशांमध्ये ही संवेदना कशा प्रकारे काम करते हे माहीत करून घेणे सोपे झाले. (क्रमशः)

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## गाळप हंगाम सुरू होऊन झाला दीड महिना

# ऊस दराच्या कोंडीमुळे उत्पादक अस्वस्थ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या जिवावर साखरसम्राट होऊन त्या जोरावर राजकारणात भराऱ्या मारणाऱ्यांची निवडणुकांची धुंदी अद्यापही उतरलेली नसल्याने गेल्या दीड महिन्यापासूनची ऊसदराची कोंडी फुटण्यास तयार नाही. ऊसदराअभावी काही कारखान्यांनी गाळलेल्या उसाचे काहीच पैसे शेतकऱ्यांना दिलेले नसल्याने त्यांची अतिशय खराब स्थिती झालेली आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या लेकराबाळाप्रमाणे वर्षभराहून अधिक काळ सांभाळलेले ऊस पीक गळीत हंगाम सुरू झाल्यानंतर साखर कारखान्यांत गाळपासाठी दिले. मात्र, त्याचे पैसे मात्र अद्यापही शेतकऱ्यांना



मिळालेले नाहीत. कारखान्यांनी दराची कोंडी कधी फुटेल, याची वाट न पाहता किमान पाचशे रुपयांनी तरी पहिला हप्ता शेतकऱ्यांना द्यावा, अशी केविलवाणी प्रतिक्रिया ऊस उत्पादक शेतकरीवर्गातून येत आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमधून राज्यकर्ते अद्याप बाहेर पडलेले नाहीत. राज्यातील ऊस गळीत हंगामास साखर आयुक्तांनी १५ नोव्हेंबरला परवानगी दिली. मात्र, प्रत्यक्षात काही कारखाने डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये सुरू झाले. यामध्ये ऊस उत्पादकांनी आपला ऊस कारखान्यांना पाठविला. मात्र, एक महिना होऊन गेला तरी सुरुवातीला ऊस घातलेल्या शेतकऱ्यांना अद्याप पैसे मिळालेले नाहीत.

ऊसदराची कोंडी कोण फोडणार? याकडे लक्ष लागले असले, तरी ज्या शेतकऱ्यांनी वर्षभर ऊस सांभाळून तो कारखान्याला घालवला, त्यांची प्रपंचासह पुढील पिकांची लगबग व सर्व मदार या ऊसबिलावरच अवलंबून असते, याचे भान राज्यकर्त्यांना राहिलेले दिसत नाही.

### कारखानदाराचे संगनमत तर नाही ना?

● एरवी ऊसदरावरून पहिली उचल जादा देण्यावरून रस्सीखेच लागणाऱ्या पुणे जिल्ह्यातील साखरपट्ट्यात यंदा मात्र अल्प ऊस असून, देखील साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू होऊन दीड महिना उलटून गेला, तरी पहिली उचल कुणीही जाहीर केलेली नाही. त्यामुळे दराबाबत संगनमत करून तर हे साखरसम्राट गप्प नाहीत ना? अशी साशंकता शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

# सासवड मध्ये विविधतेतून एकतेचा संदेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बाल विकास मंदिर शाळेत विविधतेतून एकतेचा संदेश देत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले.

यावर्षी स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. सुमंत वाघोलीकर तसेच महाराष्ट्र भूषण पुरस्कार विजेते प्रसिद्ध ढोलकी वादक प्रल्हाद कदम उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे तसेच, कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव सुधीर भोसले, शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे, शंतनु सुरवसे, शिक्षक प्रतिनिधी सुरेखा जगताप, पालक प्रतिनिधी सौ. मनिषा टिळेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन झाली. संगीत शिक्षक जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी अनुराज चाचर, सार्थ शिंदे, अनन्या भिसे उपस्थित होते. मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे यांनी प्रास्ताविकातून शाळेचा अहवाल सादर करत शाळेच्या शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील यशप्राप्तीवर प्रकाश टाकला. दिपक कांदळकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

विविधतेतून एकता या संकल्पनेखाली विविध राज्यांची झलक दाखविणारी नृत्य, नाटिका विद्यार्थ्यांनी सादर केली. इ. पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी गुजरात, पंजाब, राजस्थान, गोवा, महाराष्ट्र, जम्मू - काश्मिर, तामिळनाडू, केरळ या राज्यांची सांस्कृतिक परंपरांचा वेशभूषा, भाषा आणि नृत्यातून परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनी या सादरीकरणातून विविधतेतून एकतेचा संदेश दिला. सूत्रसंचालन स्वाती बोरावके, अश्विनी कदम यांनी केले तर आभार सुरेखा जगताप यांनी मानले.

## संगम सांस्कृतिक परंपरांचा

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सासवड :** येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बाल विकास मंदिर शाळेत विविधतेतून एकतेचा संदेश देत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले

## १५ दिवसांनंतर प्रकार उघडकीस

# अपहरण केलेल्या मुलाच्या हत्येनंतर आत्महत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** गून्हा मागे घेण्यासाठी आणि प्रियसी व तिच्या नवऱ्याला धडा शिकविण्याच्या नादात माथेफिरु विकृताने प्रेयसीच्या मुलाचे अपहरण करून त्याची हत्या केल्याचे १५ दिवसांनंतर उघड झाले.

निरगुडसर (ता. आंबेगाव) येथून १२ वर्षीय विद्यार्थ्याचे अपहरण करुन हत्या करण्याची धक्कादायक घटना (ता.११) ते (ता.२४) डिसेंबर २०२४ रोजी या दरम्यान घडली आहे. २४ डिसेंबर रोजी मयत विद्यार्थी आर्यन विक्रम चव्हाण याचा मृतदेह संगमनेर जवळील राजापूर परिसरात एका कोरड्या विहिरीत मिळून आला आहे आणि आरोपी राजेश जंबुकर यानेही राहत्या घरात फाशी घेऊन आत्महत्या केली आहे.

सविस्तर माहिती अशी की, राजेश रोहिदास जंबुकर याने बुधवार, ११ डिसेंबर रोजी आंबेगाव तालुक्यातील निरगुडसर येथील आर्यन चव्हाण या पाचवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचे अपहरण केले होते. या प्रकरणी त्याच्या वडिलांनी पारगाव कारखाना (ता. आंबेगाव) पोलीस ठाण्यात अपहरणाची तक्रारही दाखल केली होती. यानंतर आरोपी राजेश जंबुकर हा आर्यन चव्हाण याला घेऊन फरार होता. पोलिसांनी आरोपीचा तपास सुरू केला, परंतु आरोपी राजेंद्र जंबुकर हा कुठेही मिळुन आला नाही. मात्र, मंगळवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास राजेंद्र जंबुकर याने राहत्या घरात ढोलेवाडी येथे गळफास घेऊन आत्महत्या केली. तथापि, आर्यन कुठे आहे, असा प्रश्न सर्वांना पडत होता.



राजेश रोहीदास जंबुकर

पारगाव पोलीस या प्रकरणाचा तपास करत असताना, अपहरण झालेल्या मुलाचा मृतदेह त्यांना मंगळवारी रात्री उशिरा तालुक्यातील राजापूर शिवारात आढळला. पोलिसांच्या तपासामध्ये सीसीटीव्ही कॅमेरामध्ये विद्यार्थी आर्यन चव्हाण व आरोपी राजेश जंबुकर हा एका हॉटेलमध्ये ११ डिसेंबर रोजी चार वाजण्याच्या सुमारास नाष्टा करत असल्याचे पोलिसांना दिसुन आले. त्यानंतर पोलिसांनी राजापूर परिसरात तपास सुरू केला. घटनेतील काही बारकावे व सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेऊन



आर्यन विक्रम चव्हाण

मंगळवारी रात्री या मुलाचा मृतदेह राजापूर शिवारात एका पडक्या विहिरीत आढळून आला. आर्यन चव्हाण यांचे अपहरण करणाऱ्या आरोपीनेच आर्यनचा खून केला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान राजेश जंबुकर यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहलेली एक चिठ्ठी पोलिसांना सापडली असून त्यानुसार अनेक गोष्टींचा उलगडा होणार आहे.

(फोटो -: आयकार्ड फोटो -आर्यन चव्हाण व आरोपी राजेश जंबुकर.)

# पुरंदर पूर्व भागात दुष्काळी परिस्थिती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागात सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी टँकरने पाणी आणून पिके वाचवण्यासाठी प्रयत्न करू लागले आहेत.

सध्या शेतीतील पिके जगविण्यासाठी पाणी मिळत नसल्याने व पिके जळू लागल्याने पुरंदर तालुक्यातील नायगाव येथील शेतकरी बांधवांनी पाण्याचा टँकर विकत घेऊन पीक वाचविण्यासाठी प्रयत्न चालवला आहे.

१० दिवसांपासून त्यांनी हा प्रयत्न सुरु केला आहे. या वर्षी पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागात



कमी पाऊस झाल्यामुळे विहिरी, बोअरची पाणीपातळी खोलवर गेल्याने शेती व पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे.

पुरंदर उपसा सिंचन योजना व जनाई उपसा सिंचन योजनांचे योग्य नियोजन नसल्याने व पुरंदर उपसा सिंचन योजनेमध्ये सतत बिघाड होत असल्याने शेतकऱ्यांना वेळेवर पाणी मिळत नाही.

# श्री ज्योतिर्लिंग सोसायटीच्या अध्यक्षपदी दिनेश किन्हाळे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**वाल्हे :** पुरंदर तालुक्यातील मांडकी येथील श्री ज्योतिर्लिंग विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मांडकी या संस्थेची अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाची निवड प्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पुरंदर सहकारी संस्था सहाय्यक निबंधक श्रीकांत श्रीखंडे यांनी कामकाज पाहिले. चेअरमन पदासाठी दोन अर्ज आले होते. दिनेश यशवंत किन्हाळे व राहुल यशवंत जगताप या दोन उमेदवारांमध्ये अध्यक्षपदासाठी लढत झाली. यात दिनेश यशवंत किन्हाळे भरघोस मतांनी विजयी झाले. उपाध्यक्षपदी एकनाथ बुनगे यांची बिनविरोध निवड झाली. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक तथा सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक मानसिंगतात्या जगताप, भैरवनाथ पाणी पुरवठाचे चेअरमन दशरथ शिंदे, माजी उपसरपंच विजय साळुंखे, श्रीकांत जगताप, अशोक शिंदे, विष्णू जगताप, संतोष जगताप, सचिव संतोष शिंदे, संस्थेचे सर्व संचालक उपस्थित होते.

# बिबट्यांच्या हल्ल्यांचे वाढते प्रमाण चिंताजनक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** शिरुर तालुक्यातील बिबट्याचे माणसांवरील वाढत्या हल्ल्यांचे प्रमाण चिंताजनक असून, ग्रामीण भागात दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार असल्याचे मत विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केले.

रांजणगाव गणपती येथील श्रीमहागणपतीचे आरती व दर्शन केल्यानंतर विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते दानवे बोलत होते. यावेळी देवस्थान ट्रस्टच्या वतीने दानवे यांचा देवस्थान ट्रस्टचे मुख्य



रांजणगाव गणपती येथील श्रीमहागणपती मंदिरात विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा सत्कार करण्यात आला.

विश्वस्त ओमकार देव, उपाध्यक्ष संदीप दौडकर व राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाचुंदकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व महागणपतीची प्रतिमा देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख पोपटराव शेलार, संदीप शिंदे, किरण देशमुख, राहुल शिंदे, युवा उद्योजक रावसाहेब पाचुंदकर, ओंकार जवक, विशाल शेळके, व्यवस्थापक बाळासाहेब गोऱ्हे, संदीप रणपिसे आदि उपस्थित होते.

रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्टच्या विविध विकासकामांचे कौतुक करत उर्वरित महत्वपूर्ण विकासकामांच्या निधीकरिता शासन दरबारी आवश्यक ते सर्वोत्तोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन विरोधी पक्षनेते दानवे यांनी यावेळी दिले.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक

# इच्छुकांना लागली आस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**दौंड :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती, नगरपरिषद, महापालिकेच्या निवडणुकांच्या बाबतीत एका सकारात्मक वक्तव्याने जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या इच्छुक उमेदवारांना एक आस निर्माण झाली आहे.

गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या निवडणुका या साधारणपणे तीन महिन्यांच्या आसपास होण्याचा शक्यता निर्माण होऊ शकते, असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याने इच्छुकांचा जीव भांड्यात पडलेला आहे. सर्वोच्च न्यायालयात असलेल्या ओबीसी आरक्षणाचा



तिढा लटकलेला आहे. हा प्रश्न न्यायप्रविष्ट असल्याने राजकीय इच्छाशक्ती अभाव दिसून आला आहे.

त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. आता विधानसभेच्या निवडणुका होऊन स्थिर सरकार स्थापन झाले आहे. त्यातही मुख्यमंत्री यांनी पुढील तीन महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू शकतात, असे वक्तव्य केल्याने एक वेगळेच वातावरण तयार झाले आहेत. इच्छुक पुन्हा एकदा तयारीला लागले की आहेत.

# महिलेला विनयभंग, मारण्याची धमकी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** पारोडी येथील महिला गावातील चौकाजवळ असताना, अभिषेक टेमगिरे याने तिचा विनयभंग केला, तर यावेळी अभिषेक सोबत असलेल्या त्याच्या चार साथीदारांनी महिलेला शिवीगाळ, दमदाटी करत महिलेला कोयता दाखवत जीवे मारण्याची धमकी दिली. घडलेल्या प्रकाराबाबत पिडीत महिलेने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अभिषेक बाळासाहेब टेमगिरे (ता. पारोडी ता. शिरुर) याच्या सह त्याच्या चार अनोळखी साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे.



## पहाटेपासून पडणाऱ्या दाट धुक्याने शेतकरी बांधव धास्तावले

# कांदा पिकावर करपा, मरचा प्रादुर्भाव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**वाल्हे :** मागील काही दिवसांपासून पहाटेपासून दाट धुके पडत आहे. या धुक्यामुळे भाजीपाल्यावर कीड-रोगांचा प्रादुर्भाव होण्याची तसेच लागवड केलेल्या कांद्याचे नुकसान होण्याच्या भीतीने शेतकरी धास्तावले आहेत. पहाटेच्या वेळी दाट धुके व दवबिंदू पडत आहे. यामुळे लाल कांदा, उन्हाळी कांद्याच्या रोपांवर करपा व मर रोगाचा प्रादुर्भाव होत असल्याने कांदा उत्पादक शेतकरी हैराण झाला आहे. यामुळे महागड्या औषधांची फवारणी करून, शेतकरी पिके वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे.



नगदी पिक म्हणून वाल्हे (ता. पुरंदर) परिसरामध्ये कांदा लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. मात्र, लागवड केलेल्या कांद्याला तसेच काढणीला आलेल्या कांद्याच्या पिकांवर मागील काही दिवसांपासून रात्री धुके व पहाटे दवबिंदू, दिवसभर ढगाळ वातावरणामुळे त्यावर करप्याचा प्रादुर्भाव होत आहे. दररोज धुके पडत असल्याने, कांदा उत्पादन शेतकरीवर्ग अडचणीत सापडत आहे. सध्या कांद्याला मिळणारा बाजारभाव कमी प्रमाणात असून सध्याच्या कांद्याच्या लागवडीचा खर्च देखील वसुल होणे अवघड होत असल्याचे कांदा उत्पादकांनी सांगितले.

मागील १५ दिवसांपूर्वी रब्बी हंगामातील पिकांना पोषक अशी थंडी पडत होती. मात्र,मागील आठवड्यापासून थंडीचा कडाका कमी होऊन, हवामानात बदल होत असून दोन-तीन दिवसांपासून दिवसभर ढगाळ वातावरण होत असून पावसाची शक्यता व ढगाळ हवामान यामुळे रब्बीतील मका, कांदा, गहू, ज्वारी, हरभरा, तूर, पालेभाज्या आदी पिकांना रोगराईच्या प्रादुर्भावाचा धोका निर्माण झाला आहे.

### ऊसाला लागला तुरा

● साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू झाला असला, तरी दरवर्षीच्या तुलनेत यंदा दीड ते दोन महिना उशिरा ऊसतोड सुरू झाली आहे. त्यामुळे आडसाली ऊस तुटण्यास आधीच उशीर झाला असून उभ्या उसाला तुरा लागला आहे. अशात अवकाळी पाऊस झाला, तर तोडणी आणखी लांबणार आहे. शिवाय, तोडलेला ऊस रस्त्यावर काढण्यासाठी वाहतुकीचा आर्थिक भुर्दंड बसणार आहे. आधीच दीड वर्ष पीक शेतात अन् त्यात आस्मानी संकट ओढवण्याच्या शक्यतेने ऊस उत्पादकांची चिंता वाढणार आहे.

» Selected

## अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त सुशासन दीन



**जेजुरी :** माजी पंतप्रधान आणि भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या शंभराव्या जयंती निमित्त जेजुरीत भाजपाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या वतीने सुशासन दीन साजरा करण्यात आला. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दिवस दरवर्षी 'सुशासन दिन' साजरा केला जातो. त्यांचा साधेपणा आणि प्रामाणिकपणा राजकारणासाठी प्रेरणादायी त्यानिमित्ताने त्यांच्या वैचारिक श्रीमंती आणि साधेपणाच्या जीवनातील काही पैलूंवर जेजुरी येथील कार्यक्रमात भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रकाश खाडे यांनी विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमात नवनिर्वाचित पुणे जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष साकेत जगताप यांचा सत्कार करण्यात आला. जेजुरी येथे भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते आणि जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष शामकाका पेशवे यांच्या निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजपाच्या कोल्हापूर जिल्हा प्रभारी अलका ताई शिंदे, ज्येष्ठ नेते प्रसाद अत्रे, तालुका प्रमुख मंगल पवार, जेजुरी शहर महिल्सध्यक्षा उमा खुंटे, भाजपाचे पुणे जिल्हा कार्यकारिणी सदस्य सचिन पेशवे, दशरथ उबाळे, जेजुरी शहर सरचिटणीस विक्रम माळवदकर, स्वानंद अत्रे, प्रतिक म्हेत्रे, विजया भोसले, पुरंदर युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष अमोल जगताप, तसेच भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद अत्रे यांनी तर आभार सचिन पेशवे यांनी मानले.

## देशपांडे विद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ



**बारामती :** महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कै.ग. भि. देशपांडे विद्यालयात प्रमुख अतिथी यशस्वी उद्योजक चंद्रगुप्त शहा वाघोलीकर यांचे उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. १९७० च्या बॅचचे माजी विद्यार्थी असलेले शहा म्हणाले की शाळेचा लौकिक आजही टिकून आहे. चित्रकला, प्रयोग आदी उपक्रमातील विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांनी पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाला समितीचे अध्यक्ष अजय पुरोहित यांनी अध्यक्षीय भाषणातून आजच्या या नवीन युगात मुलांवर फेसबुक, इंस्टाग्राम, टीव्ही व मीडिया यांचा अतिरेक होऊन चुकीचे संस्कार होत असल्याची खंत व्यक्त करून भाषा, भूषा, भोजन, भजन, भ्रमण या पंच-परिवर्तनांचे संस्कार मुलांवर करण्याचे आवाहन उपस्थित सर्वांना केले. मुख्याध्यापिका रोहिणी गायकवाड, उपमुख्याध्यापक राजाराम गावडे, समन्वयक पुरुषोत्तम कुलकर्णी, स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष दत्तात्रय शेरखाने, पर्यवेक्षक शेखर जाधव, दिलीप पाटील, जयश्री शिंदे, क्रीडाध्यक्ष प्रशांत सोनवणे, इंग्लिश मीडियम च्या मुख्याध्यापिका सोनाली क्षीरसागर, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका मोनिका खेडलेकर, पूर्व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका अनिता तावरे आदी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सविता सनगर यांनी तर परिचय व स्वागत रवींद्र गडकर यांनी केले. सूत्रसंचालन मोहिनी देशपांडे यांनी केले आणि दत्तात्रय शेरखाने आभार मानले.

## बांगलादेशी बोगस डॉक्टरला अटक

**उरुळी कांचन :** कोणताही वैध दाखल नसताना भारतात घुसखोरी करून मागील काही दशकापासून राहणाऱ्या एका ५० वर्षीय संशयित बांगलादेशी बोगस डॉक्टरला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई दहशतवाद विरोधी पथकाने थेऊर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत मंगळवारी केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी हा मूळ परदेशी नागरिक असून त्याचा जन्म बांगलादेश मध्ये झाला आहे. आरोपीने कोणत्याही वैध प्रवासी कागदपत्राशिवाय तसेच भारत बांगलादेश सिमेवरील अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश केला. आरोपीने सर्वात प्रथम कोलकाता (पश्चिम बंगाल) येथे प्रवेश केला. त्यानंतर देशातील विविध ठिकाणे फिरून तो थेऊर येथे अवैधरीत्या वास्तव्य करत होता. त्याने थेऊर परिसरात दवाखानाही थाटला होता.

## सुदामराव कुटे यांचे निधन

**कारेगाव :** शिरुर तालुक्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या रांजणगाव गणपती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे माजी अध्यक्ष सुदामराव गणपतराव कुटे (वय ६७) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, बहिणी, एक मुलगा, दोन मुली, सून व नातवंडे असा परिवार आहे. येथील ग्रामपंचायतीचे माजी सदस्य, युवा उद्योजक संदीप कुटे हे त्यांचे पुत्र होत.



# विज्ञानवार्ता

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर



## प्राणीही होतात 'टल्ली'

मद्यपान आरोग्यासाठी हानिकारक आहे; पण तरीही अनेक जण त्याच्या आहारी जातात. पण, एका संशोधनानुसार असे आढळून आले आहे की, माणूसच नाही, तर प्राणीदेखील नशा करतात. आफ्रिकेच्या जंगलातील याबाबतचा एक व्हिडीओ समोर आला आहे. आफ्रिकेच्या जंगलातून एक व्हिडीओ समोर आला आहे, ज्यामध्ये जंगलातील प्राणी धुंद अवस्थेत पाहायला मिळाले. जंगलातील एका खास झाडाची फळे खाल्ल्यानंतर हे सर्व प्राणी नशेत टल्ली होतात, असे यात दिसून आले.

आफ्रिकेतील जंगलात आढळणाऱ्या मारुला वृक्षाची फळे खाऊन प्राण्यांना नशा होते. तिथे ही झाडे अगदी सहज आढळतात. याला दरवर्षी फळे येतात. ही फळे पुरेशी पिकल्यावर खाली पडू लागतात. जेव्हा जंगलातील प्राणी हे फळ खातात, तेव्हा हळूहळू त्यांना नशा चढते आणि सर्व धुंद असल्यासारखे वागू लागतात. याचा एक मजेदार व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत अनेक प्राणी झाडाची पिकलेली फळे खाताना दिसले. ते आरामात बसून फळे खात होते; मात्र काही वेळातच अनेकांना त्याची नशा झाली.

पोटभर फळे खाऊन जेव्हा ते चालण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांना सरळ चालता येत नाही. यासोबतच एकदा पूर्ण नशेत गेल्यानंतर थेट दुसऱ्या दिवशी त्यांना जाग आली, त्यावेळी देखील ते बरेच सुस्तावलेले दिसून आले. सदर फळांमध्ये असा कोणता अर्क होता, यावर संशोधन सुरू आहे. मात्र, त्यापूर्वी हा व्हिडीओ सोशल मीडियावर सातत्याने व्हायरल होत आला आहे. नेटिझन्सनी यावर अनेक मतमतांतरे नोंदवली आहेत. काहींच्या मते फळांमध्ये प्राण्यांना गुंगवणारा एखादा अंश असू शकतो, तर काहींनी असे चित्र जंगलात सातत्याने दिसून येत असेल, असे म्हटले आहे.



## ब्रेन स्कॅनिंगद्वारे मनोविकार उलगडणार

सध्याच्या काळात अनेक लोक मानसिक आजारांच्या विळख्यात अडकत आहेत. अशा आजारांचे योग्य निदान व उपचार महत्वाचे ठरतात. मेंदूचे स्कॅनिंग करून मानसिक आजारांचा शोध घेणे सहज शक्य असल्याचे एका संशोधनात स्पष्ट झाले आहे. त्याचप्रमाणे मेंदूसंबंधी अन्य आजारांचे निदान करणेही शक्य आहे.

या संशोधनाची माहिती 'न्यूरॉन' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली आहे. एमआयआर स्कॅनिंगद्वारे मेंदूतील महत्त्वाच्या भागातील प्राथमिक फरक ओळखणे सहजशक्य होते. मेंदूचा विकार नसलेल्यांना या आजारांपासून दूर ठेवणे शक्य आहे. मेंदूच्या स्कॅनिंगच्या माध्यमातून मेंदूसंबंधी विकार दूर करण्याकडे पहिले पाऊल पडल्याचे वॉशिंग्टन वैद्यकीय विद्यापीठाचे प्राध्यापक स्टीव्हन पीटरसन यांनी सांगितले. स्कॅनिंगसाठी आम्ही एमआरआय चाचणीचा विकास केला तेव्हा या चाचणीतून नेमके काय साध्य करायचे याचा विचार करणे आवश्यक होते. मात्र या चाचणीद्वारे वैद्यकीय चाचणी क्षेत्रासाठी नवी कवाडे खुली झाली आहेत. या संशोधनासाठी संशोधकांनी दहा तासांत नऊ नागरिकांच्या मेंदूचे स्कॅनिंग केले. प्रत्येकाची एक तास तपासणी केल्यानंतर संशोधकांनी वरील निदान केले. चाचणीच्या आधी व्यक्तीचे मानसिक आजार, क्षमता, वाचनाची क्षमता आणि अन्य गुणांचा विचार करण्यात आला होता. चाचणीत व्यक्तीच्या मेंदूच्या विविध भागांची, बदललेल्या घटकांची माहिती होते. त्याद्वारेच रुग्णाचा आजार शोधणेही शक्य असल्याचा शोध घेण्यात आला.

## महासागरांची महती

पृथ्वीच्या पृष्ठभागाचा ७१ टक्के भाग पाण्यानेच व्यापलेला आहे. त्यामध्ये महासागरांचा हिस्सा सर्वात मोठा आहे. एका संशोधनानुसार जगातील महासागर हे केवळ सागरी जीवांसाठीच नाही, तर मानवी आरोग्य आणि कल्याणासाठी देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पाणी, हवा याप्रमाणेच महासागर आपल्यासाठी महत्त्वाचे आहेत. 'वनअर्थ'मध्ये प्रसिद्ध झालेल्या या नव्या अभ्यासानुसार, मानवी आरोग्य आणि कल्याणासाठीचे महासागराचे महत्त्व सांगण्यात आले आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर, हार्वर्ड इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ आणि ड्यूक युनिव्हर्सिटी मरीन लॅबोरेटरी यांनी केलेल्या या अभ्यासातून सागरी संरक्षित क्षेत्र निसर्ग आणि मानव या दोघांसाठीही कशी फायदेशीर ठरू शकतात, याची माहिती मिळते. रिपोर्टमध्ये २३४ सागरी संरक्षित क्षेत्रांचे विश्लेषण करण्यात आले. त्यापैकी ६० टक्के क्षेत्रांमध्ये जैवविविधता आणि मानवी कल्याणात सकारात्मक बदल दिसून आले. याचा अर्थ सागरी संरक्षित क्षेत्रांचा विस्तार केल्यास सागरी पर्यावरण अधिक बळकट तर होऊ शकतेच, शिवाय आजूबाजूच्या किनारपट्टीच्या भागांसाठीही फायदेशीर ठरू शकते. अशा भागात जैवविविधता संवर्धनाबरोबरच शाश्वत वापराला



परवानगी दिली जाते. उदाहरणार्थ, सागरी पर्यावरणाला हानी न पोहोचवणाऱ्या काही मासेमारी पद्धतींना येथे परवानगी आहे. महासागरांमध्ये मानवी आरोग्यासाठी आवश्यक असणारे भरपूर पोषक घटक असतात. आपले खंड आणि बेटे विविध जलीय स्रोतांनी वेढलेले आहेत. येथून जीवनसत्त्वे, खनिजे आणि फॅटी ॲसिड असलेले पदार्थ मिळतात. जलीय पदार्थांमधील ही पोषक द्रव्ये शरीरात सहज शोषली जातात आणि पौष्टिकदृष्ट्या कमकुवत लोकांपर्यंत पोहोचवल्यास कुपोषणाचा मुकाबला करण्यास मदत होते. वाढत्या लोकसंख्येबरोबर जलचरांच्या अन्नाची मागणीही वाढत असल्याने समुद्रावरील ताण वाढत आहे. संयुक्त राष्ट्र पुरस्कृत जैवविविधता योजनेअंतर्गत २०३० पर्यंत जगातील ३० टक्के जमीन आणि महासागरांचे संरक्षण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत महासागरांचे संवर्धन महत्त्वाचे आहे. कारण, मानवी जीवन महासागरांच्या निरोगी अवस्थेवर अवलंबून असते. सागरी संरक्षित क्षेत्रांचा विस्तार मानवी कल्याणासाठी किती आवश्यक असू शकतो हे दर्शविणारा हा अभ्यास या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. सागरी संवर्धन शास्त्रज्ञ डॅनियल वियाना यांच्या नेतृत्वाखालील पथकाने १९७३ पासून सागरी संरक्षित क्षेत्रांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला. सागरी संरक्षित क्षेत्रांचा आणखी एक फायदा म्हणजे मासे व इतर सागरी जीवांची संख्या वाढविण्यास ते उपयुक्त ठरतात. मात्र, सागरी संरक्षित क्षेत्रातून कुपोषणाची समस्या सोडविणे आव्हानात्मक ठरणार आहे. सागरी संरक्षित क्षेत्रात मानवी हस्तक्षेप मर्यादित केल्यास सागरी जीवांची लोकसंख्या आणि सागरी आरोग्य सुधारू शकते, असे या अभ्यासात सुचविण्यात आले आहे.



## इथे नाही एकही भारतीय...!

वेगवेगळ्या कारणांमुळे जगभरात भारतीय लोक पोहोचलेले आहेत. अनेक देशांमध्ये तर भारतीय लोक आपले कर्तृत्वही गाजवत आहेत. मोठ्या कंपन्यांचे सीईओपासून ते इतर महत्त्वाच्या पदांवर भारतीय लोकांचा दबदबा दिसतो. पण, तुम्हाला माहीत आहे का, की अनेक देशांमध्ये भारतीयांची उपस्थिती खूपच कमी आहे. एक देश तर असा आहे जिथे सामान्य भारतीय माणूस आढळणारही नाही. हा देश म्हणजे उत्तर कोरिया. उत्तर कोरियात कठोर नियम आहेत. हा एक हुकूमशाही शासन असलेला देश आहे. त्यामुळे येथे बाहेरील देशांतून येणाऱ्या लोकांवर कडक नजर ठेवली जाते. येथील सरकार परदेशी नागरिक आणि स्थलांतरितांसाठी खूप कठोर नियम बनवते, ज्यामुळे इतर देशांतील लोक येथे स्थायिक होण्यासाठी किंवा काम करण्यासाठी येऊ शकत नाहीत.

उत्तर कोरियामध्ये भारतीय समुदाय आढळणार नाही. भारत आणि उत्तर कोरियाचे राजनैतिक संबंध असले, तरी त्यांच्यात सांस्कृतिक किंवा राजकीय संपर्क फारच कमी आहे. येथे भारतीयांना नोकरी किंवा इतर कारणांसाठी जाणे देखील अवघड आहे. कारण उत्तर कोरियामध्ये आर्थिक संधी खूप मर्यादित आहेत. महत्त्वाचे म्हणजे इथे कठोर व्यवस्था असल्यामुळे दुसऱ्या देशांतील लोकांना येथे स्थायिक होणे कठीण जाते. उत्तर कोरियामध्ये इंटरनेट आणि सोशल मीडियावर देखील कठोर निर्बंध आहेत. ज्यामुळे बाहेरील देशांतील लोकांना तेथे राहणे आणखी कठीण झाले आहे. याचे आणखी एक कारण म्हणजे उत्तर कोरियाचे सरकार परदेशी नागरिकांच्या हालचालींवर कडक नियंत्रण ठेवते असते. पर्यटकांनाही नेहमी गाईडसोबतच राहावे लागते. पर्यटकांच्या प्रत्येक हालचालींवर येथील व्यवस्था बारीक लक्ष ठेवून असते. त्यामुळे भारतीयांसह इतर बहुतांश देशांतील नागरिकांना तेथे जाणे अवघड झाले आहे. येथे कठोर राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती आहे. ज्यामुळे भारतीयांना तेथे राहणे जवळजवळ अशक्य आहे.

## जुन्या केकची किंमत दोन लाख?

केक हा नाशवंत खाद्यपदार्थ आहे, ही बाब आपल्या सर्वांना माहितीच असेल; मात्र सध्या ८० वर्षांपूर्वीचा एक केक चर्चेत आला आहे. जवळपास ८० वर्षे जुना असलेला हा केक लाखो रुपयांना विकला गेला आहे. हा केक ब्रिटनची महाराणी एलिझाबेथ द्वितीय आणि प्रिन्स फिलिप यांच्याशी संबंधित आहे. या केकची लाखो रुपयांना खरेदी-विक्री का झाली, तो खाण्यायोग्य नाही तरीही त्याला लाखो रुपये किंमत का मिळाली, असे अनेक प्रश्न मनात आल्याशिवाय राहणार नाहीत.

२० नोव्हेंबर १९४७ रोजी ब्रिटनची महाराणी एलिझाबेथ द्वितीय आणि प्रिन्स फिलिप यांचा विवाह झाला होता. हा केक त्यांच्याच लग्नात सर्व्ह करण्यात आला होता. हा केक जवळपास आठ दशके सुरक्षित ठेवण्यात आला. त्यावर तत्कालीन राजकुमारी एलिझाबेथची चांदीची प्रतिमादेखील कोरलेली होती. आता स्कॉटलंडमध्ये या केकचा लिलाव करण्यात आला आहे. एलिझाबेथ द्वितीय आणि फिलिप यांच्या लग्नाच्या वेळी कापलेल्या केकचा हा तुकडा आहे. या दोघांच्या लग्नसोहळ्यात नऊ फूट उंच आणि २०० किलोग्रॅमपेक्षा जास्त वजनाचा



केक तयार करण्यात आला होता. सध्या लाखो रुपये किमतीला विकला गेलेला केक सुरक्षित राहावा यासाठी एका बॉक्समध्ये ठेवण्यात आला होता. हा बॉक्स बकिंगहॅम पॅलेसमधून एडिनबर्ग इथल्या होलीरूड हाऊसमध्ये घरकाम करणाऱ्या मेरियन पोल्सन यांना राणीने पाठवला होता. भव्य लग्नसोहळ्यानंतर भेटवस्तूच्या रूपात मेरियन यांना हा केकचा तुकडा पाठवण्यात आला होता. याच तुकड्याला आता २.३६ लाख रुपये (२,८०० डॉलर्स) किंमत मिळाली आहे.

एलिझाबेथ द्वितीय आणि फिलिप यांच्या सोहळ्यासाठी तयार करण्यात आलेल्या केकचे दोन हजारांहून अधिक तुकडे करण्यात आले होते. उर्वरित केक धर्मादाय संस्था आणि इतर संस्थांना पाठवण्यात आला होता. याच केकचा एक तुकडा प्रिन्स चार्ल्सच्या नामकरणविधीसाठी (बाप्तिस्मा) बाजूला ठेवण्यात आला होता. राजघराण्यातल्या शाही केकची विक्री होण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही अनेक दशकांपूर्वीच्या शाही केकचे तुकडे विकले गेले आहेत. २०१३मध्ये अशाच एका वेडिंग केकच्या तुकड्याला २३०० डॉलर्स (सुमारे २ लाख रुपये) किंमत मिळाली होती. किंग चार्ल्स आणि प्रिन्सेस डायना यांच्या लग्नात सर्व्ह केलेल्या केकचा देखील २०२१ साली लिलाव करण्यात आला होता. त्याला २,५६५ डॉलर्स (२.२५ लाख रुपये) किंमत मिळाली होती.

## न्याहारी चुकवताय? मग हे वाचा

सकाळची न्याहरी राजासारखी करावी, अशी म्हण प्रचलित आहे. सकाळची न्याहरी पोटभर केल्याने अनेक फायदे आरोग्याला होतात. त्यातच न्याहरी




टाळणाऱ्या लोकांना लठ्ठपणाचा धोका असून त्यांचे पोट सुटण्याचीही शक्यता असल्याचा दावा एका अभ्यासात करण्यात आलेला आहे.

जे लोक सकाळी न्याहरी करणे टाळतात, त्यांतील २६.७ टक्के लोकांमध्ये लठ्ठपणा आढळून आला असून जे लोक नियमित न्याहरी करतात, त्यांच्यामध्ये हे प्रमाण १०.९ टक्के एवढे असल्याचे अमेरिकेतील मायो चिकित्सालयातील संशोधकांना आढळले. त्याचप्रमाणे कधीही न्याहरी न करणाऱ्या लोकांनी मागील काही वर्षांत त्यांच्या वजनात सर्वाधिक वाढ झाल्याची माहिती दिल्याचे अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. अनियमित न्याहरी करणे हे वजन वाढणे आणि लठ्ठपणाशी संबंधित असल्याचे कधीच न्याहारी न करणाऱ्यांमधील लठ्ठपणाच्या प्रमाणामुळे अधिक स्पष्ट झाले आहेत, असे संशोधकांनी सांगितले. अभ्यासासाठी संशोधकांनी ३४७ लोकांच्या न्याहरीच्या सवयीचे २००५ पासून २०१७ पर्यंत विश्लेषण केले. यामध्ये सहभागी झालेले लोक १८ ते ८७ वयोगटातील होते. या अभ्यासात सहभागी झालेल्यांची उंची, वजन, कमरेचा आकार आदी माहिती घेण्यात आली होती. जे लोक न्याहरी टाळतात, त्यांच्या कमरेचे सरासरी माप ९७.५ सेमी असून हे नियमित न्याहरी करणाऱ्या लोकांच्या तुलनेने ९.८ सेमी जास्त होते.

## ब्रेन एजिंग रोखणे शक्य

सातत्याने सक्रिय राहण्याचा सल्ला नेहमी दिला जातो आणि त्यामागे शास्त्रीय कारण देखील आहे. जसे आपले वय वाढत असते, तसे मेंदूचे वयही वाढत असते. ब्रेन एजिंग ही एक अशी संज्ञा आहे, जी न्यूरो सायन्समध्ये अनन्यसाधारण महत्त्वाची मानली जाते. यावर नवनवी संशोधने देखील होत आली आहेत. अशाच एका संशोधनात रोज आपण नवनव्या बाबी आत्मसात करण्यावर भर दिला, तर ब्रेन एजिंग रोखता येते, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

ब्रेन एजिंग ही एक प्राकृतिक प्रक्रिया आहे. ती साधारणपणे २८ ते ३० वर्षांपासून सुरू होते. यामध्ये मेंदूचे कॉग्निटिव्ह फंडक्श अर्थात स्मृती व एकाग्रता यावर हळूहळू परिणाम होऊ लागतो. आता यातील प्रत्येकाचा अनुभव वेगळा असतो. मात्र, शास्त्रज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, आपल्या जीवनशैलीचा प्रभाव ब्रेन एजिंगवर हमखास पडतो. यामध्ये आपल्या मेंदूतील न्यूरॉन, प्लॅस्टिसिटी कमी होत जाते. यामुळे तणाव वाढत राहतो. ब्रेन प्रोसेसिंगचा वेग आणि व्यक्तीची समस्या निकालात काढण्याची क्षमतादेखील कमी होत जाते. ब्रेन



एजिंगमुळे अल्झायमर, डिमेंशिया व पार्किन्सनसारख्या स्मृतीशी संबंधित आजार सुरू होतात.

ऑनलाईन जर्नल न्युरॉलॉजीमध्ये प्रकाशित एका संशोधनानुसार, ज्या लोकांना झोपेशी संबंधित समस्या होत्या, त्यांच्या ब्रेन एजिंगचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले आहे. याचे प्रमाण अनेक मार्गांनी कमी करता येते, असे या संशोधकांचे मत आहे. न्युरो सायंटिस्ट डॉ. लीसा मॉस्कोनी यांच्या मतानुसार, जेनेटिक्स, लाईफस्टाईल याचा ब्रेन एजिंगवर बराच फरक पडतो. यामुळे ब्रेन एजिंग रोखायचे असेल तर रोज काही ना काही नवे शिकण्यावर, नवे आत्मसात करण्यावर भर द्यायला हवा. यामुळे न्यूरल कनेक्शन्सचे प्रमाण वाढते आणि यामुळे मेंदू अधिक सक्रिय राहतो. नवी भाषा शिकणे किंवा नवे वाद्य शिकणे अवघड असते; पण असे केल्यास आपण आपल्या मेंदूला अधिक चालना देऊ शकतो.

आपण सतत तणावात राहात असल्यास यामुळे ब्रेन एजिंग आणखी वेगाने वाढत राहते, असाही निष्कर्ष यात नोंदवला गेला आहे. संशोधकांनी दिलेल्या माहितीनुसार, अशा परिस्थितीत आपल्या दैनंदिनीत ध्यान व सखोल श्वासावर भर असेल, तर त्याची उत्तम फलिते दिसून येतात. कम्फर्ट झोनमधून बाहेर येण्याची सवय असल्यास यामुळे आपण मानसिक व शारीरिकदृष्ट्या अधिक तंदुरुस्त असतो आणि अशा व्यक्तींना मेडिकल सायन्समध्ये सुपरएजर्स असे म्हटले जाते. अशा व्यक्तींच्या मेंदूत सेल लॉसही कमी असतो आणि त्यांची एखादी समस्या निकालात काढण्याची क्षमताही अधिक सरस असते. सुपरएजर्स व्यक्तींचे नवनवे विषय अभ्यासण्यावर अधिक भर असतो. एखादे जटिल गणित सोडवणे, कोडे सोडवणे, आर्टिकल वाचणे किंवा एखादी नवी भाषा शिकणे यात त्यांचा हातखंडा असतो.

## पाकच्या अफगाणिस्तानवरील हल्ल्याला प्रत्युत्तर देणार?

# तालिबानी सैनिकांचे पाककडे कूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पाकिस्तानी लष्कराने मंगळवारी अफगाणिस्तानच्या पूर्व भागात हवाई हल्ला केला होता. यामध्ये ४६ जण ठार झाले. या हल्ल्याला सडेतोड प्रत्युत्तर देण्याचा निर्धार अफगाणिस्तानने केला आहे. १५ हजार तालिबानी सैनिकांनी पाकिस्तानच्या दिशेने कूच केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काबुल, कंदहार आणि हेरातमधून सुमारे १५ हजार तालिबानी सैनिक खैबर पख्तूनख्वाच्या मीर अली सीमेकडे रवाना झाले आहेत. अफगाणिस्तानवर हवाई हल्ला करणाऱ्या पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असे तालिबानच्या प्रवक्त्याने स्पष्ट केले आहे.

तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तानने नुकतेच वझिरीस्तानच्या माकिन भागात केलेल्या हल्ल्यात ३० पाकिस्तानी सैनिक ठार झाले होते. याला प्रत्युत्तर देण्यासाठी पाकिस्तानने हवाई हल्ला केला. या हल्ल्यात ४६ जण ठार झाले असून, याची गंभीर दखल तालिबान सरकारने घेतली आहे. अफगाण तालिबानकडे मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दुर्गम भागात लपण्याची क्षमता आहे. त्यांच्याकडे एके-४७ , मोर्टार, रॉकेट लाँचर यांसारख्या आधुनिक शस्त्रांचा मोठा साठा आहे. तसेच डोंगररांगांमध्ये होणाऱ्या हल्ल्यात हे सैनिक विशेष प्रशिक्षित आहेत. पाकिस्तानमधील शेहबाज शरीफ सरकार आर्थिक संकटाचा सामना करत आहे. अनेक अंतर्गत मुद्द्यांमुळे सरकार आणि लष्कर दोघेही कमजोर झाले आहेत. आता तालिबानसोबतच्या संघर्षामुळे हे संकट आणखी वाढले आहे.

तालिबानांनी आजवर मोठ्या लष्करी शक्तीपुढे झुकलेले नाही. रशियानंतर अमेरिकेसारख्या महासत्तेला त्यांनी वर्षानुवर्षे आव्हान दिले. तसेच अमेरिकेला अफगाणिस्तानातून परत जाण्यासही भाग पाडले. आता मीर अली सीमेवर वाढत्या हालचालींमुळे पाकिस्ताननेही आपल्या लष्कराला सतर्क केले आहे. सीमावर्ती भागात सैन्याची तैनाती वाढवण्यात आली आहे. स्थानिक लोकांमध्ये भीतीचे वातावरण असून, या परिस्थितीमुळे मोठा संघर्ष होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.



### पाकिस्तानात दहशतवादी हल्ले वाढले

● अफगाणिस्तानमध्ये तालिबानने पुन्हा एकदा सत्ता ताब्यात घेतल्यापासून पाकिस्तानमध्ये दहशतवादी हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. इस्लामाबादमधील सेंटर फॉर रिसर्च अँड सिक्युरिटी स्टडीजच्या अहवालानुसार, २००२ च्या तुलनेत २०२३ मध्ये पाकिस्तानमधील दहशतवादी हल्ल्यांमुळे झालेल्या मृत्यूंमध्ये ५६ टक्के वाढ झाली आहे. तालिबान्यांनी केलेल्या हल्ल्यात मागील वर्षभरात ५०० सुरक्षा कर्मचाऱ्यांसह १,५०० नागरिक ठार झाले आहेत. तसेच इस्लामाबादने व्यापार निर्बंध लादले आहेत. तसेच व्हिसा धोरण कठोर करत पाच लाखांहून अधिक अफगाण स्थलांतरितांना पाकिस्तानमधून बाहेर काढले आहे. तेव्हापासूनही दोन्ही देशांमधील संबंध अधिक ताणले गले आहेत.



## Selected

### झहीर खान शिर्डीत श्रीसाईचरणी दाखल

**शिर्डी** : भारताचा माजी दिग्गज डावखुरा वेगवान गोलंदाज मुळचा शिर्डी जवळील श्रीरामपूर येथील रहिवासी असलेल्या झहीर खाननं आज पत्नी सागरिकासह शिर्डीत येत साई समाधीचं दर्शन घेतलं. यानंतर त्यानं माध्यमांशी बोलताना आपल्या लहाणपणींच्या आठवणींना उजाळा दिला. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर शहारात लहानसा मोठा झालेल्या झहीरनं क्रिकेट विश्वात आपलं नाव कमावलं. लहान पणापासूनच त्याचे वडील त्याला साई दर्शनासाठी घेवुन येत असे, यानंतर त्यानं आज अनेक दिवसानंतर आपली पत्नी सागरिका हिच्या समवेत शिर्डीला येत साईंच्या समाधीचं दर्शन घेतलं. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीनं मंदिर प्रमुख विष्णु थोरात व जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके यांनी त्याचा शाल व साईंची मुर्ती देवून सत्कार केला. यावेळी साईबाबा संस्थानचे संरक्षण अधिकारी रोहीदास माळी उपस्थित होते.



### अजमेर येथील दर्ग्याजवळील अवैध बांधकामावर बुलडोझर



**जयपूर** : राजस्थान प्रशासनाने अजमेर येथील ख्वाजा गरीब नवाज दर्ग्याजवळ असलेल्या अवैध जागेत असलेले बांधकाम बिलडोझरने तोडले. यावेळी असलेल्या संबंधित दुकानावर आणि इतर लोकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले होते. अतिक्रमण हटवताना दुकानदारांनी प्रशासनाशी वाद घालण्यास सुरूवात केली. याप्रकरणाबाबतची कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासन सांगितले. ही घटना गुरुवारी घडली असल्याची माहिती समोर आली आहे. अजमेर दर्ग्याच्या दिल्ली गेट आणि अधाई दिन झोपरासह उर्वरित भागांत अजमेक प्रशासनाच्या सहकार्याने महापालिकेने ही कारवाई केली आहे. महापालिकेने गल्लोगल्ली लावण्यात आलेल्या दुकांनांची अतिक्रमणे हटवण्यात आली. लाखोंच्या संख्येने उरूसासाठी लोक येणार याआधी ही कारवाई करण्यात आली. दरम्यान दुकानदारांना याआधीही नोटीशी बजावण्यात आल्या होत्या. दर्ग्याच्या सर्वेक्षणासाठी मागणी करणारी याचिका स्थानिक न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली असल्याचे सांगण्यात येत आहे. अशातच आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार याबाबतची सुनावणी सध्या स्थगित करण्यात आल्याचे वृत्त आहे.

## माता श्री वैष्णोदेवी रोप-वेला स्थानिकांचा विरोध

# कटरा येथे ७२ तासांचा बंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** माता वैष्णोदेवी रोप-वे प्रकल्पाविरोधात कटरा येथे ७२ तासांचा बंद सुरू झाला असून, त्यात स्थानिक दुकानदार, टट्टू विक्रेते आणि इतर व्यापारी सहभागी झाले होते. रोप-वे प्रकल्पाविरोधात आवाज उठवणाऱ्या श्री माता वैष्णोदेवी संघर्ष समितीच्या वतीने या बंदचे आयोजन करण्यात आले आहे. रोप-वे प्रकल्पामुळे स्थानिक व्यवसाय आणि रोजगार नष्ट होईल, असे आंदोलकांचे म्हणणे आहे. या बंदमुळे माता वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

श्री माता वैष्णोदेवी श्राइन बोर्डाने (एसएमव्हीडीएसबी) गेल्या महिन्यात २५० कोटी रुपये खर्चाच्या रोप-वे प्रकल्पाची घोषणा केली होती. १३ किमी लांबीच्या या ट्रेकसाठी चालता न येणारे वृद्ध, मुले आणि यात्रेकरूंसाठी ताराकोट मार्ग ाला सांजी छटशी जोडण्याचा उद्देश आहे.

मात्र, या प्रकल्पामुळे त्यांच्या उपजीविकेला धोका निर्माण झाल्याचे संघर्ष समिती आणि स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे. यात्रेकरूंच्या पारंपारिक मार्गावर अवलंबून असलेले स्थानिक मजूर, दुकानदार आणि सेवा पुरवठादार या प्रकल्पामुळे बेरोजगार होऊ शकतात, असा त्यांचा दावा आहे.

### आंदोलनात तणाव वाढला, पोलिसांचा लाठीचार्ज

● आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज केल्याने कटरा येथे तणाव निर्माण झाला. काही आंदोलकांना ताब्यातही घेण्यात आले. सुरक्षा राखण्यासाठी कटरा येथे फ्लॅग मार्चही काढण्यात आला. यात्रेदरम्यान रेस्टॉरंट बंद असल्याने आणि लोकल वाहतूक विस्कळीत झाल्याने भाविकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.



## तोतया पोलिसाच्या आवळल्या मुसक्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सातारा** : शासकीय नोकरीच्या अमिषानं ९० लाख रुपये उकळून तरुणांची फसवणूक करणाऱ्या तोतया आयपीएस अधिकाऱ्याला अखेर खऱ्या पोलिसांनी गजाआड केलं. श्रीकांत विलास पवार (रा. श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर) असं तोतया अधिकाऱ्याचं नाव आहे. तो कराड जवळच्या कोयना वसाहतीत वास्तव्यास होता.

नोकरी लावण्याच्या आमिषानं तोतया आयपीएस अधिकाऱ्यानं तरुणांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याची माहिती डीवायएसपी अमोल ठाकूर आणि कराडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू ताशिलदार यांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश माळी आणि पोलीस अंमलदार संदीप कुंभार, अशोक वाडकर, महेश शिंदे यांनी काही दिवसांपासून तोतया अधिकाऱ्यावर पाळत ठेवली होती.

## लाडकी बहिण योजनेमुळे अन्य योजना अडचणीत?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने अनेक लोक कल्याणकारी योजना आणल्या होत्या. विशेष म्हणजे त्या योजनांचा जनतेलाही फायदा झाला होता. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना राज्यात महायुतीसाठी गेमचेंजर ठरल्याचं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. खरं तर ही योजना महायुतीसाठी क्रांतिकारक ठरलीय. या योजनेने महायुतीला ऐतिहासिक विजय मिळवून दिलाय. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेतील सहावा हप्ता मंगळवारपासून यायला सुरुवात झालीय. या योजनेसाठी वार्षिक ४६ हजार कोटींचा खर्च दाखवण्यात आलाय. पण अद्यापपर्यंत २४ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याचं समोर आलंय. या योजनेत निधी कमी पडत असल्याने अन्य योजनांचा निधी या योजनेकडे वळवला गेला होता, अशी विरोधकांनी टीका केली होती. मात्र या योजनेसह महायुतीतील अनेक योजनांवर निधीअभावी संक्रांत येण्याची शक्यता असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेसाठी निवडणुकीपूर्वी होमगार्डमधील कर्मचाऱ्यांच्या पगाराचे पैसे वळविण्यात आले होते. त्यामुळे या एका योजनेमुळे अन्य योजनांवर ताण असल्याचे दिसून आले होते. योजनेत जी तरतूद केली, तेवढा निधी अद्यापपर्यंत मिळालेला नाही.



## ट्रेडेजचा गुंतवणूकदारांना सावधगिरीचा इशारा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वित्तीय बाजारातील अग्रगण्य कंपनी ट्रेडेज इन्व्हेस्टमेंट कंपनीने गुंतवणूकदारांसाठी सावधगिरीचा इशारा दिला आहे. ट्रेडेज ही कंपनी स्टॉक मार्केटमध्ये परताव्याची कोणतीही हमी देत नाही, असे कंपनीने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे. शेअर बाजारातील गुंतवणूकीतील गैरव्यवहार वाढले असल्याच्या पार्श्वभूमीवर कंपनीने हा खुलासा दिला आहे. कंपनीने निवेदनात असे म्हटले आहे की, दिशाभूल करणारे खोटे दावे आणि योजना बाजारात येत असल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून कंपनी इशारा देत आहे. शेअर बाजारात खात्रीशीर परतावा देण्याचे खोटे दावे जे केले जातात, त्याचेही कंपनीने खंडन केले आहे. शेअरबाजारातील गुंतवणूक ही अंगभूत जोखीमआणि अनिश्चिततेसह येते. असे असूनही, गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी उच्च, हमी परताव्याचे आश्वासन देणाऱ्या योजनांच्या संख्येत वाढ झाली आहे. त्यावर विश्वास ठेवल्यास गुंतवणूकदारांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. अशा योजनांमधील सहभाग गुंतवणूकदारांच्या स्वतःच्या जोखमीवर असतो. अधिकमाहिती साठी, कृपया www.Trdez.com येथे भेट देण्याचे आवाहन केले आहे. ट्रेडेज इन्वेस्टमेंट प्राइवेट लिमिटेड नोंदणी क्रमांक : INZ000311938

## पुराचे थैमान

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**हैती :** हैतीच्या पोर्ट-डी-पेक्समध्ये मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरामुळे अक्षरशः थैमान घातले असून, तेथील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

## केजरीवालांच्या निवासस्थाना बाहेर भाजपची निदर्शने

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत मुख्यमंत्री महिला सन्मान योजनेवरून सातत्याने निदर्शने करण्यात येत आहेत. या मुद्द्यावरून भाजप आम आदमी पक्षाला कोंडीत पकडण्याच्या तयारीत आहे.

दिल्ली भाजप महिला मोर्चाने माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या फिरोजशाह रोडवरील निवासस्थानाबाहेर गुरुवारी (दि.२६) निदर्शने केली. दिल्ली पोलिसांनी आंदोलनकर्त्या महिलांना घटनास्थळावरून ताब्यात घेतले आहे.

दिल्ली भाजप महिला प्रदेशाध्यक्षा ऋचा मिश्रा पांडे आणि माजी प्रदेशाध्यक्ष महिला मोर्चा योगिता सिंह यांच्या नेतृत्वाखाली शेकडो महिलांनी हातात पोस्टर घेऊन अरविंद केजरीवाल सरकारचा निषेध केला.

योगिता सिंह म्हणाल्या की, आज आम्ही अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानाबाहेर शांतता मार्गाने निदर्शने करत आहोत.

पंजाबमध्ये आश्वासन दिले आहे. तिथे पैसे देणार का?, याचा जाब विचारण्यासाठी आलो आहोत. ते बनावट माध्यमांद्वारे लोकांची नोंदणी करत आहेत आणि विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांचा वैयक्तिक डेटा देखील गोळा करण्याचा प्रयत्न करत आहेत.

१ हजार रुपये देण्याचे आश्वासन यापूर्वी दिले होते मात्र, ते आजतागायत दिलेले नाही. निवडणुकीपूर्वी पुन्हा २,१०० रुपयांचे आश्वासन देण्यात आले जे पूर्णपणे खोटे आहे, अशा प्रकारे महिलांची फसवणूक होत असल्याची तक्रारही आम्ही पोलिसांत करणार आहोत.



## कल्याणमधील चिमुकलीवर अत्याचार प्रकरणी मुख्यमंत्री फडणवीसांवर संजय राऊतांची टीका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कल्याणमध्ये १३ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याची संतापजनक घटना घडली आहे. प्रकरण समोर आल्यानंतर सध्या कल्याण परिसरात तणावाचं वातावरण आहे. नागरिकांमध्ये संताप असून संबंधित आरोपीला फाशीच्या शिक्षेची मागणी केली जात आहे. सध्या पोलिसांनी आरोपी आणि त्याच्या पत्नीला बुलढाणा येथून अटक केली आहे. एका बाजुला बीड आणि परभणीतल्या हत्येच्या घटना चर्चेत असतानाच आता कल्याणमधील घटनेनं महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापलं आहे. या प्रकरणावरून खासदार संजय राऊत यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर टीका केली आहे.

याबाबत माध्यमांशी बोलताना खासदार संजय राऊत म्हणाले की, कल्याण अंबरनाथ हा उपमुख्यमंत्र्यांच्या लाडक्या चिरंजीवांचा जिल्हा आहे. त्यांनी वेगळा संसार थाटल्यापासून या जिल्ह्यात महिला अत्याचार, दरोडे, लुटमार, बलात्कार, महिलांच्या हत्या, धमक्या देण्याचे प्रमाण वाढले आहेत. या भागात गुंडाना अभय दिलं जातय. तिथले खासदार मतदारसंघात फिरत ही नाही. बदलापूरच्या अक्षय शिंदे प्रकरणानंतर हे भयानक प्रकरण आहे. बलात्कार खून करणारे हे बीड आणि कल्याणमध्ये का असतात? बदलापूरच्या प्रकरणात राजकीय फायद्यासाठी आरोपी अक्षय शिंदेचा महायुती सरकारनं एन्काऊंटर केला. आता कल्याणमध्ये चिमुकलीवर त्या गवळीनं अत्याचार केला, या प्रकरणावर देवेंद्र फडणवीस आणि ते खासदार गप्प का?" असा सवाल खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे.




## मुंबईतील बेकऱ्यांवर कठोर कारवाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पावसाळा संपल्यानंतर मुंबईतील प्रदूषणात वाढ होताना दिसते. विशेष म्हणजे हे चित्र दरवर्षी पाहायला मिळतं. त्यानंतर महापालिकेलाही जाग येते आणि नियम जारी केले जातात. परंतु ते नियमही अनेक कंपन्या जवळपास धाब्यावर बसवतात. परंतु यंदा मात्र पालिकेने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असून, मुंबईत प्रदूषणासाठी कारणीभूत ठरणाऱ्या बांधकामांवर पालिकेने दंडात्मक कारवाई केलीय. प्रदूषण करणाऱ्यांविरोधात कारवाई करत पालिकेने एकाच दिवसात तब्बल ५६ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल केलाय. महापालिकेच्या माहितीनुसार, मुंबईत अनेक पुनर्विकासाची कामे सुरू आहेत. त्यातून वातावरणात मिसळणारी धूळ, गाड्यांमधून उत्सर्जित होणाऱ्या धुरामुळे प्रदूषणात वाढ होते. मात्र, आता महापालिकेने बेकरी व्यावसायिकांनादेखील प्रदूषणासाठी कारणीभूत ठरवले असून, तब्बल ६५० बेकरी व्यावसायिकांना पालिकेने यासंदर्भात नोटिसा पाठवल्यात.

महापालिकेच्या म्हणण्यानुसार, बेकरी भट्ट्या हेदेखील वायू प्रदूषणाचे प्रमुख कारण आहे. मुंबईतील ४७ टक्के बेकरी व्यावसायिक भट्टीसाठी भंगार लाकूड इंधन म्हणून वापरतात. त्यातून निघणाऱ्या धुराचा लोकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. यात प्रामुख्याने बांधकामात वापरलेले लाकूड, फर्निचर बनवणाऱ्यांकडून मिळालेले उरलेले लाकूड, जुने तुटलेले फर्निचर, सॅनमाईका-प्लायबोर्ड आदींचा वापर केला जातो.

त्यामुळे यातून मोठ्या प्रमाणात प्रदूषित वायू आणि धूर वातावरणात मिसळतो, त्याचा मुंबईकरांच्या आरोग्यावर परिणाम होतो. महापालिकेच्या माहितीनुसार, मुंबईत सुमारे १ हजार २०० बेकऱ्या असून, यातील निम्म्याहून अधिक बेकऱ्या अनधिकृत आहेत.



## राज्याच्या प्रगती आणि विकासावर चर्चा करणारा उद्योजकीय कार्यक्रम

# महाराष्ट्र ग्रोथ स्टोरी कॉन्क्लेव्ह पर्व ४ संपन्न !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र ग्रोथ स्टोरी कॉन्क्लेव्ह हा एक राज्य म्हणून महाराष्ट्राच्या प्रगती आणि विकासावर चर्चा करण्यासाठी अर्थसंकेतने रचना आर्टस् अँड क्रिएशन्सच्या सहयोगाने उद्योजकीय कार्यक्रम आयोजित केला होता.

बांधकाम, पायाभूत सुविधा, आयटी आणि उत्पादन ते कृषी आणि पर्यटन यासारख्या उद्योगांच्या दोलायमान मिश्रणासह, महाराष्ट्राने गेल्या काही वर्षांत उल्लेखनीय वाढ दर्शविली आहे. या यशात योगदान देणारे घटक जसे की सरकारी उपक्रम, पायाभूत सुविधांचा विकास आणि गुंतवणुकीच्या संधी, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी शेअर बाजारातून भांडवल उभारणे हे या परिषदेचे उद्दिष्ट होते. पुढील सहयोग आणि भविष्यातील वाढीच्या पुढाकारांसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देत भारताच्या अर्थव्यवस्थेतील एक पॉवरहाऊस बनण्याच्या दिशेने महाराष्ट्राचा प्रवास हा कॉन्क्लेव्ह साजरा करत आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून येस बँकेचे मुंबई उपाध्यक्ष दीपक शर्मा, अर्थसंकेतचे संस्थपाक डॉ अमित बागवे, रचना आर्टस् अँड क्रिएशन्सच्या रचना लचके बागवे तसेच विशेष अतिथी म्हणून सॅटर्डे क्लबच्या सल्लागार मानसी मांजरेकर, जेष्ठ उद्योजक चंद्रहास राहटे, डिजिटल कोच जोतिराम सपकाळ, पायोनियर वेल्थ सोल्युशन्सचे वैभव शेटे, डिव्हाईन हेल्थकेअरचे वैभव बागवे व बिझनेस कोच रोहित सोलकर उपस्थित होते.

यावेळी अर्थसंकेत 'युवा उद्योजक' पुरस्काराने श्री. संकेत खाडे तसेच 'बिझनेझ अचिव्हर्स' पुरस्काराने मकरंद शेरकर, जॉय मसिह, दीपिका जैन, 'इन्व्हेस्टर अचिव्हर्स' पुरस्काराने संजय काठोळे व अलका काठोळे यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक करताना अर्थसंकेतचे संस्थापक डॉ. अमित बागवे यांनी महाराष्ट्र नावाचा एक हजार हुन अधिक वर्ष जुना संदर्भ दिला. तसेच मराठी माणूस उद्योजकतेमध्ये पुढे जावा यासाठी अर्थसंकेत नेहमीच प्रयत्नशील राहील असे सांगितले. डिजिटल कोच जोतिराम सपकाळ यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून व्यवसाय अनेक पटीने कसा वाढवावा यावर सुरेख मार्गदर्शन के ले. मानसी मांजरेकर यांनी बिझनेस नेटवर्किंगचे धडे उपस्थितांना दिले, तर चंद्रहास रहाटे यांनी गुंतवणुकीचे महत्व सोदाहरण पटवून दिले.





‘विराट संपूर्ण खेळपट्टीला वेढा फिरून उजवीकडे आला आणि त्याने टक्कर होण्यास प्रोत्साहन दिले. याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही. कारण विराटने जाणीवपूर्वक सॅमला खांद्याने धक्का दिला. सामनाधिकारी यावर कारवाई करतील अशी आशा आहे. — रिकी पॉन्टिंग

“मैदानावर जे काही घडतं, ते मैदानावर राहतं. मला प्रतिस्पर्धी संघाला टक्कर देत खेळणं आवडतं आणि या खचाखच भरलेल्या स्टेडियममध्ये पदार्पण करण्याशिवाय अजून चांगलं काय असू शकतं.” — सॅम कोन्स्टास



## कांगारूंचा स्कोअर ३११/६ : बुमराहला ३ विकेट

# पहिला दिवस कांगारूंचा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मेलबर्न :** बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या चौथ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्ध ६ विकेट गमावत ३११ धावा केल्या आहेत. गुरुवारी स्टंपपर्यंत स्टीव्ह स्मिथ ६८ आणि कर्णधार पॅट कमिन्स ८ धावांवर नाबाद परतले.

मेलबर्न येथील एमसीजीमध्ये ऑस्ट्रेलियन संघाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. १९ वर्षीय युवा सलामीवीर सॅम कॉन्स्टास (६० धावा) आणि उस्मान ख्वाजा (५७ धावा) यांनी कांगारू संघाला चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी ११६ चेंडूत ८९ धावांची सलामी दिली. यष्टीरक्षक ॲलेक्स कॅरी (३१ धावा) आकाश दीपने यष्टिरक्षक ऋषभ पंतच्या हाती झेलबाद झाला. जसप्रीत बुमराहने मिचेल मार्श (४ धावा), ट्रॅव्हिस हेड (०) आणि उस्मान ख्वाजा (५७ धावा) यांना बाद केले. मार्नस लॅबुशेन (७२ धावा), वॉशिंग्टन सुंदर आणि पदार्पण करणारा सॅम कॉन्स्टास (६० धावा) रवींद्र जडेजाचे बळी ठरले.

भारतीय संघ एका बदलासह आला आहे. शुभमन गिल खेळत नाही, तर वॉशिंग्टन सुंदरला संधी मिळाली आहे. त्याचबरोबर ऑस्ट्रेलियाने ब्रिस्बेन कसोटीच्या प्लेइंग-११ मध्ये २ बदल केले आहेत. जोश हेझलवूड आणि नॅथन मॅकस्वीनी बाद झाले आहेत. त्यांच्या जागी स्कॉट बोलँड आणि सॅम कोन्स्टास यांना प्रवेश मिळाला. पहिली कसोटी भारताने जिंकली आणि दुसरी कसोटी ऑस्ट्रेलियाने जिंकली त्यामुळे मालिका १-१ अशी बरोबरीत आहे.

### विराटला आयसीसीने सुनावली शिक्षा

● भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉक्सिंग डे कसोटीचा पहिलाच दिवस पदार्पण करणाऱ्या सॅम कॉन्स्टासने गाजवला. त्याने निर्भीडपणे खेळ केला. परंतु, याच सामन्यात त्याचे भारताचा स्टार खेळाडू विराट कोहलीसोबतही भांडण झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे आता विराट कोहलीवर आयसीसीने कारवाई केल्याचे समजत आहे. कसोटी मालिकेतील हा चौथा सामना असून मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर खेळला जात आहे. या सामन्यात १० व्या षटकात आधी मोहम्मद सिराज आणि सॅम कॉन्स्टास यांच्यात गरमागरमी झाल्याचे दिसले होते. १० व्या षटकानंतर विराटने पुढे जाताना सॅम कॉन्स्टासच्या खांद्याला धक्का दिल्याचे दिसले होते.

## स्केलअप ॲकॅडमी, गेम चेंजर्स संघांची विजयी सलामी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे क्रिकेट ॲकॅडमी आणि सागर कांबळे यांच्यावतीने कै. अभिषेक ठाकूर यांच्या स्मरणार्थ आयोजित ‘अभिषेक ठाकूर करंडक’ आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्वेन्टी-२० क्रिकेट २०२४-२५ स्पर्धेत स्केलअप ॲकॅडमी आणि गेम चेंजर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत वि जयी सलामी दिली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत निव नागवेकर याने केलेल्या ६९ धावांच्या जोरावर स्केलअप ॲकॅडमीने ऑलस्टार ॲकॅडमीचा ५९ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या स्केलअप ॲकॅडमीने निव नवगांवकर याच्या ६९ धावांच्यामुळे १६८ धावांचे लक्ष्य उभे केले. या आव्हानाचा पाठलाग करताना ऑलस्टार ॲकॅडमीचा डाव १०९ धावांवर आटोपला. स्केलअप संघाच्या यश बराटे याने १४ धावात ४ गडी बाद केले.



दुसऱ्या सामन्यामध्ये सौरभ दोडके याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे गेम चेंजर्सने मिझुकी क्लबचा २४ धावांनी पराभव करून शानदार सुरूवात केली. प्रथम खेळताना गेम चेंजर्सने १८ षटकात १६६ धावा धावफलकावर लावल्या. अभिनव तिवारी याने ५२ धावांची खेळी केली. याशिवाय आदिल अन्सारी (४१ धावा) आणि सौरभ दोडके (२८ धावा) यांनी धावांचे योगदान दिले. या धावसंख्येचा पाठलाग करताना मिझुकी क्लबचा डाव १४२ धावांवर मर्यादित राहीला. हिमांशु अगरवाल याने ५१ धावांची तर, राज एस. (३६ धावा) आणि इशान ओस्वाल (२३ धावा) यांनी धावा करून लढा दिला. सौरभ दोडके याने २२ धावात ३ गडी बाद करून विजयात मोलाचा वाटा उचलला.

## मनु भाकरच्या ‘खेलरत्न’ शिफारशीवरून वाद



**नवी दिल्ली :** क्रीडापटूंसाठी प्रतिष्ठेच्या असलेल्या ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराच्या शिफारशीतून जाणीवपूर्व वगळण्यात आल्याबद्दल मनू भाकरचे प्रशिक्षक जसपाल राणा यांनी क्रीडा मंत्रालय आणि क्रीडा प्राधिकर यांना दोषी धरले आहे. पॅरिस ऑलिंपिकमध्ये एक नव्हे तर दोन पदके मिळवणाऱ्या मनू भाकरला खेलरत्न पुरस्काराच्या शिफारशीतून वगळण्यात आल्याची चर्चा आहे. या प्रकाराला जसपाल राणा यांनी थेट भारतीय क्रीडा क्षेत्राची प्रमुख जबाबदारी असलेल्या या दोघांना दोषी धरले आहे. या पुरस्कारासाठी मनूने अर्ज केला नाही, असे तुम्ही कसे म्हणू शकता. एकाच ऑलिंपिकमध्ये दोन पदके मिळवणारी ती पहिली भारतीय खेळाडू आहे. त्यामुळे तिचे नाव प्राधान्याने यायलाच हवे होते. मनू भाकरच्या क्षमतेवर अविश्वास कसा काय दाखवला जाऊ शकतो, हा सरळसरळ अपमान आहे. याचा परिणाम पुढील प्रगतीवर होऊ शकतो, अशी तीव्र प्रतिक्रिया जसपाल राणा यांनी व्यक्त केली आहे.

## समीर रिझवीने राज्य स्पर्धेत ठोकले सलग दुसरे अर्धशतक

**नवी दिल्ली :** आयपीएल लिलावापूर्वी २१ वर्षीय समीर रिझवीला चेन्नई सुपर किंग्ज फ्रँचायझीने संघातून रिलीज केले होते व आयपीएल २०२५



लिलावात त्याला दिल्ली कॅपिटल्स फ्रँचायझीने संघात सामील करून घेतले. समीर सध्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये धुमाकूळ घालत आहे. त्याने पुरूषांच्या २३ वर्षांखालील राज्य स्पर्धेत खेळताना विदर्भ संघाविरूद्धच्या सामन्यात स्पर्धेतील सलग दुसरे द्विशतक ठोकले आहे. त्रिपुराविरूद्धच्या सामन्यात त्याने २०१ धावांची खेळी केली होती. तर विदर्भविरूद्धच्या सामन्यात त्याने १० चौकार व १८ षटकारांसह २०२ धावांची जलद खेळी केली आणि ४०७ धावांच्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करत सामना ८ विकेट्सने जिंकला. विदर्भाने प्रथम फलंदाजी करत तब्बल ४०६ धावा उभारल्या. ज्यामध्ये उत्तर प्रदेशच्या दोन फलंदाजांनी शतक लगावले. विदर्भाचे सलामीवीर स्वस्तात बाद झाले. पण तिसऱ्या क्रमांकावरील दानीश मेलवार व एमडी फैज यांनी शतकी खेळी केली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १३८ चेंडूत १९७ धावांची खेळी केली. ४३ व्या षटकात फैज बाद झाला आणि त्यांची भागीदारी तुटली.

## व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमी संघाचे सलग विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कमोडोर एल.एस. मेहता यांच्या स्मरणार्थ आयोजित ‘गुरू विजय दळवी करंडक’ १४ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ षटकांच्या क्रिकेट २०२४ स्पर्धेत व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमीने आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत सलग दोन विजयांची नोंद केली.

धानोरी येथील डी.एन.परांडे स्पोर्ट्स हब मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत पहिल्या सामन्यामध्ये सईश बारटक्के याने केलेल्या अर्धशतकी खेळीमुळे व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमीने घुले क्रिकेट ॲकॅडमीचा ६ धावांनी निसटता पराभव केला. व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमीने २५ षटकामध्ये १३६ धावांचे आव्हान उभे केले. सईश बारटक्के याने ५० धावांची खेळी केली. श्रेयान पारवे याने ३१ धावांचे योगदान दिले. याला उत्तर देताना घुले क्रिकेट ॲकॅडमीचा





डाव १३० धावांवर मर्यादित राहीला. अनवय कावणकर याने ५५ धावांची खेळी करून एकहाती लढा दिला.

दुसऱ्या सामन्यामध्ये युसूफ खान याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमीने पृथ्वीज् यंगस्टर ॲकॅडमीचा ९ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाज करणाऱ्या पृथ्वीज् संघाचा डाव ६८ धावांवर गडगडला. युसूफ याने १५ धावांमध्ये ३ गडी टिपले. अव्दिक मगर (२-५) आणि श्रेयान पारवे (२-१२) यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून अचूक गोलंदाजी केली. हे लक्ष्य व्हेरॉक ॲकॅडमीने ९ षटकात व १ गडी गमावून पूर्ण केले.

## विराटचा अनुष्कासह मेलबर्नच्या रस्त्यांवर फेरफटका

**मेलबर्न :** बॉर्डर गावस्कर ट्रॉफी स्पर्धेच्या निर्णायक सामन्यावर आली आहे. तिसऱ्या सामन्यानंतर दोन्ही संघ १-१ने बरोबरीत आहेत. तर उद्या, २६ डिसेंबर रोजी भारत-ऑस्ट्रेलियादरम्यान जगप्रसिद्ध बॉक्सिंग डे कसोटी सामना खेळवण्यात येणार आहे.

या सामन्यासाठी भारतीय संघाने तीन दिवस नेट्समध्ये कसून सराव केला. रोहित, शर्मा विराट कोहली सातत्याने नेट्समध्ये सराव करताना पाहायला मिळाले. त्यानंतर सामन्याच्या एक दिवसपूर्वी विराट पत्नी अनुष्कासोबत मेलबर्नच्या रस्त्यावर फेरफटका मारताना दिसला.

परदेशात गेल्यावर विराट नेहमीच आपल्याला स्ट्रीट वॉक करताना पाहायला मिळतो. यावेळी चौथ्या कसोटीच्या प्रचंड दबावाच्या सामन्याआधी विराटने अनुष्कासह वेळ घालवला.

## एएसआर स्ट्रायकर्स संघाला विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुना क्लब लिमिटेड आयोजित पीसीएफएल(पुना क्लब फुटबॉल लीग) स्पर्धेत अंतिम फेरीत एएसआर स्ट्रायकर्स संघाने झिदाने स्वीलर्स संघाचा १-० असा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

पुना क्लब फुटबॉल मैदान येथे पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत सामन्याच्या सुरुवातीपासूनच दोन्ही संघानी आक्रमक पवित्रा स्वीकारला. स्ट्रायकर्स संघाच्या आदित्य सरीन, अयान खान यांनी जोरदार आक्रमण केले, पण स्वीलर्सच्या बचावफळीने ते थोपवून लावले. पूर्वार्धात गोल शून्य बरोबरी कायम होती.

उत्तरार्धात देखील स्ट्रायकर्स संघाने आपल्या खेळात नवीन रणनीती आखत जोरदार खेळ केला. १९ व्या मिनिटाला अयान खान याने गोल करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली.




स्वीलर्सच्या राहुल हरपलानी, अक्षय चोपडा यांनी गोल करण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. सामन्याच्या शेवटपर्यंत आपली आघाडी कायम ठेवत स्ट्रायकर्स संघाने विजय मिळवला.

स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण मुंबई फाल्कन्स अँड टेरीरोचे मालक अमित गढोक, पुना क्लब लिमिटेडचे अध्यक्ष गौरव गढोक, उपाध्यक्ष इंद्रनील मुजगुले आणि पुना क्लब लिमिटेडच्या क्रीडा विभागाचे चेअरमन तुषार आसवानी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पूना क्लबच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

## पाकिस्तानसोबत कसोटी खेळण्याचे स्वप्न अधुरे राहिले

**नवी दिल्ली :** भारताचा माजी क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विनने सांगितले की, पाकिस्तानविरुद्ध कसोटी खेळण्याचे माझे स्वप्न




अधुरे राहिले. त्याला लहानपणापासूनच पाकिस्तानविरुद्ध कसोटी खेळायची इच्छा होती, पण काही कारणांमुळे ते होऊ शकले नाही. अश्विनने गोबीनाथच्या यूट्यूब चॅनलवर दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, सदागोपन रमेश यांना पाहून मला क्रिकेट खेळण्याची प्रेरणा मिळाली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कोणतीही चिंता न करता धावा करणारा तो तामिळनाडूचा पहिला फलंदाज होता. मला स्वप्नातही पाकिस्तानविरुद्धची त्याची खेळी आठवत असे. 18 डिसेंबर रोजी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील ब्रिस्बेन कसोटीनंतर अश्विनने निवृत्ती घेतली. कर्णधार रोहित शर्मासोबत पत्रकार परिषदेत त्याने निवृत्तीची घोषणा केली होती. वयाच्या ३८ व्या वर्षी त्याने भारतासाठी ५३७ कसोटी विकेट्स घेतल्या, पण त्याला पाकिस्तानविरुद्ध खेळण्याची संधी मिळाली नाही. अश्विन म्हणाला, 'माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे अपूर्ण स्वप्न राहिले की मी पाकिस्तानविरुद्ध कधीही कसोटी सामना खेळू शकलो नाही. तथापि, असे होत असते. आता मी खूप काही करू शकत नाही अशा गोष्टीचा विचार देखील करू शकत नाही जे बदलणे माझ्या सामर्थ्यात नाही.

## अथर्व राणे, अरहान आचलिया, अद्वैत फेरे, अन्वय समग, अद्वैत जाधव यांची आगेकूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुधांशु बॅडमिंटन अकादमी यांच्या वतीने आयोजित डेक्कन जिमखाना पुरस्कृत योनेक्स सनराईज एसबीए कप जिल्हास्तरीय सुपर १०० मानांकन बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत अथर्व राणे, अरहान आचलिया, अद्वैत फेरे, अन्वय समग, अद्वैत जाधव यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

डेक्कन जिमखाना बॅडमिंटन कोर्ट या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत ११ वर्षांखालील मुलांच्या गटात पहिल्या फेरीत सहाव्या मानांकित अरहान आचलियाने अर्णव गद्रेचा १०-१५, १५-८, १५-९





असा संघर्षपूर्ण पराभव केला. अथर्व राणेने प्रथमेश शुक्लाचा १५-३, १५-४ असातर , अव्वल मानांकित अद्वैत फेरेने अर्णव गयानेचा १५-८, १५-७ असा पराभव करून आगेकूच केली. 13 वर्षांखालील मुलांच्या गटात अन्वय समगने प्रथमेश जगदाळेचे आव्हान १५-१३, १५-१३ असे संपुष्टात आणले. अद्वैत जाधवने श्रमण सपकाळवर १५-५, ७-१५, १५-११ असा तीन विजय मिळवला.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटात पहिल्या फेरीत आरुष वकीलने अक्षर झोपेला १५-१२,१५-१३ असे पराभूत केले. ध्रुव समुद्रने वेदांत जोशीचा १५-८, ९-१५, १५-१२ असा कडवा प्रतिकार केला. स्पर्धेचे उद्घाटन डेक्कन जिमखानाचे मानद सचिव मिहिर केळकर, क्लबचे वित्तीय विभागाचे सचिव गिरीश इनामदार, क्लबच्या बॅडमिंटन विभागाचे सचिव चंद्रशेखर आपटे आणि पीडीएमबीएचे खजिनदार सारंग लागू यांच्या हस्ते करण्यात आले.

## क्रिककिंगडम युनायटेड संघाचा पहिला विजय

**पुणे :** क्रिककिंगडम यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या क्रिककिंगडम चॅम्पियन्स करंडक १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत डीपीएस डायनामोज संघाने सलग तिसरा विजय मिळवला.

शापूर्जी पालोनजी मैदान व वीरांगना क्रिकेट मैदान या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत तपन बेहेरा नाबाद(७१धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर क्रिककिंगडम युनायटेड संघाने ओडीएम ग्लॅडिएटर्स रांची संघाचा ७ गडी राखून पराभव करत पहिला विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात कृतीन बी(३-३२) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर सिंगापूर थंडरबोल्ट संघाने डीपीएस डायनामोज संघाचा १६ धावांनी पराभव केला.





## गार्गी एज्यूकॉन व शंतनु शुटर्स यांच्यात अंतिम लढत

**पुणे :** कै.ला.सागर डोमसे यांच्या स्मृती प्रित्यर्थ लायन्स क्लब ऑफ पुणे रहाटणी यांच्या वतीने आयोजित कै. सागर डोमसे प्रौढ(४०वर्षांवरील)



करंडक टी -२०क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरीत शंतनु शुटर्स व गार्गी एज्यूकॉन या संघांनी लवास व मेव्हरिक्स लिजेंडस संघांचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. फोर स्टार मैदान हिंजवडी या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत पहिल्या सामन्यात संतोष पुणेकर(५९धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर शंतनु शुटर्स संघाने लवास संघाचा ११ धावांनी पराभव करून अंतिम फेरी गाठली. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीत प्रफुल्ल मानकर(२-३८ व २०) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर गार्गी एज्यूकॉन संघाने मेव्हरिक्स लिजेंडस संघाचा 3 गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

## समोर आले विनोद कांबळीचे संपूर्ण कुटूंब; हॉस्पिटलमध्ये साजरा केला ख्रिसमस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी सध्या आजाराशी झुंज देत आहे. त्याला काही दिवसांपूर्वीच मुंबईतील भिवंडी येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. त्याच्यावर तिथे उपचार सुरू आहेत.

यादरम्यान अनेकांनी त्याची भेट घेतली आहे. नुकताच जगभरात ख्रिसमस साजरा झाला. पण ख्रिसमस साजरा होत असताना कांबळी मात्र हॉस्पिटलमध्ये होता. त्यामुळे त्याच्या कुटुंबाने ख्रिसमस साजरा केला. त्याने ख्रिसमस साजरा करतानाचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे. उत्कर्ष सिंग



या सोशल मिडिया युझरने विनोद कांबळीचा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये दिसते की विनोद कांबळी हॉस्पिटलच्या बेडवर असून त्याच्यासोबत त्याचा मुलगा, मुलगी आणि पत्नी अँड्रीया हेविट दिसत आहेत. त्याच्यासमोर केक आहे.

त्याचबरोबर त्याच्या आजूबाजूला अनेक लोकंही आहेत. त्याच्या मुलीने ख्रिसमसनिमित्त केकही कापला. कांबळीची हॉस्पिटलची रुमही फुग्यांनी सजवण्यात आली होती.

### ३ सुवर्ण व ३ रौप्य पदकांचे ठरले मानकरी

## योगासन स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलला ६ पदके

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्हा स्तरीय शालेय योगासन स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूल ने पदकांची लयलूट केली. येथे झालेल्या योगासन क्रीडा स्पर्धेत स्कूल ने एकूण ६ पदके जिंकली असून त्यापैकी ३ सुवर्ण व ३ रौप्य पदकांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदेच्या वतिने आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत ‘योगासन’ स्पर्धा नुकतीच जुन्नर येथील बेल्हे बांगरवाडीच्या समर्थ कॉलेजमध्ये संपन्न झाली. १४ व १९ वर्षवयोगटातील खेळाडूंनी या



स्पर्धेत चांगली कामगिरी करून आपली प्रतिभा दाखविली. अंडर १४ मुलांमध्ये मेधांश बहादुर हा सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. तर अंडर १४ मुलींमध्ये महिका पटवर्धन हिने १ सुवर्णपदक व १ रौप्यपदक पटकावले. तसेच अंडर १९ मुलींमध्ये सई कुलकर्णी ला सुवर्णपदक मिळाले.

जिल्हा स्तरीय स्पर्धेत अभूतपूर्व कामगिरी करणाऱ्या या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतांना ध्रुव ग्लोबल स्कूलचे संचालक यश मालपाणी म्हणाले, आजपर्यंत योगासने केवळ रोगांपासून मुक्ती मिळवण्यासाठी प्रभावी मानली जात आहेत. मात्र योग हा खेळ नसून प्रथमच अंगीकारून ध्रुव येथील हुशार विद्यार्थ्यांनी त्याला नवे रूप दिले आहे. तसेच स्कूलच्या प्रिन्सीपल संगीता राऊतजी यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्यात. प्रशिक्षक वैष्णवी आंद्रे, प्रगती देशमुख आणि वैष्णव कोरडे यांनी त्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.